LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल,डि.पी. रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ४६ वा फोन २३०१०१ दिनांक १३ जानेवारी २०२६ मंगळवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

प्रफुल्ल पटेलांकडून धनंजय मुंडेंच्या मंत्रीपदाचे संकेत भाजपमध्ये प्रवेश करु नये म्हणून खेळली नवी खेळी

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- राज्याच्या राजकारणामध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा गेल्या महिनाभरापासून जोरात होत आहे. त्यांच्या या चर्चेला ब्रेक देण्यासाठी एनडी टीव्हीवर झालेल्या एका कार्यक्रमात राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी धनंजय मुंडेंना मंत्री पदाचे संकेत दिले आहेत. तेंव्हा जनतेत संभ्रम होता, आरोप केले जात होते म्हणून धनंजय मुंडेंचे मंत्री पद काढून घेतले गेले. जेंव्हा त्यांचे नाव क्लिअर होईल तेंव्हा ते पुन्हा मंत्री मंडळात दिसतील असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.

गेल्या महिनाभरापासून धनंजय मुंडे हे पक्ष नेतृत्वावर नाराज आहेत अशा बातम्या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या आहेत. त्यातच मागच्या महिन्यात माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्ली येथे जाऊन भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. भाजपच्या इतर वरिष्ठ नेत्यांनाही धनंजय मुंडे भेटले, नगर पालिका निवडणुकीच्या दरम्यान आणि त्यानंतर बीड जिल्हा परिषदेच्या विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी अजितदादा दोन चार वेळेस बीडमध्ये येऊन गेले परंतु एकाही कार्यक्रमात अजितदादांच्या व्यासपीठावर धनंजय मुंडे दिसून आले नाहीत. त्यामुळे ते नाराज आहेत या चर्चेला आणखी पुष्टी मिळाली. मागच्या आठवड्यामध्ये श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथील कार्यक्रमात धनंजय मुंडे व्यासपीठावर दिसले.

- **जनतेतील संभ्रम आणि नाराजी किंवा आरोप पाहता पक्ष म्हणून निर्णय घेतला गेला होता, त्यामुळे आम्ही त्यांना बाजुला होण्यास सांगितले होते.**
- **धनंजय मुंडेंविरोधात एकही पुरावा पुढे आलेला नाही**
- **ज्यावेळी धनंजय मुंडेंचे नाव क्लिअर होईल त्यावेळी ते मंत्री मंडळात दिसतील**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ते हेलिकॉप्टरमधून मुंबईकडे रवाना झाले. धनंजय मुंडेंची भाजपच्या नेत्यांसोबत जवळीक वाढल्याने ते पक्ष सोडणार आहेत अशी चर्चा सुरु झाली असतांनाच राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी एनडी टीव्ही या न्यूज चॅनलला मुलाखत देत असतांना धनंजय मुंडेंच्या विषयावर खुलासा केला आहे.

प्रफुल्ल पटेल म्हणाले की, धनंजय मुंडे यांचे मंत्री पद काढून घेतल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उलटलेला आहे. त्या वेळेस त्यांच्या संदर्भात जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता, आरोप होत होते त्यामुळे पक्षाने त्यांना मंत्री पदाचा राजीनामा द्यायला लावला. त्यांचा राजीनामा कोणी मागितलेला नव्हता. आता त्यांना क्लीनचीट मिळाली, त्यांचे नाव क्लिअर झाले, ते पुन्हा मंत्री झालेले दिसून पान २ वर

सव्वा महिन्यापूर्वी गायब झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध नेकनूर पोलिसांना लागेना शोध की लावीनात ?

नेकनूर दि.१२ (प्रतिनिधी):- पोलिसांनी ठरवलेच तर अगदी कपड्याच्या बटन वरून किंवा अगदी लहानात लहान सुगाव्यावरून कोणत्याही गोष्टीचा शोध लागतो. मात्र गेल्या सव्वा महिन्यापासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध मात्र नेकनूर पोलिसांना लागत नसल्याने नेमका शोधच लागत नाही, की नेकनूर पोलिसांना शोधच लावायचा नाही. हा प्रश्न मुलीचे आई-वडील व नातेवाईकांमधून ऐकावयास मिळत आहे. अधिक माहिती अशी की, बीड तालुक्यातील धावज्याची वाडी येथील एक अल्पवयीन मुलगी गेल्या सव्वा महिन्यापूर्वी गायब झालेली आहे. ही मुलगी गायब झाल्याच्या नंतर आई-वडील व नातेवाईकांनी सर्वत्र शोधाशोध केली असता ही मुलगी मिळून न आल्याने मुलीच्या आई वडील व नातेवाईकांनी नेकनूर पोलिसांमध्ये धाव घेतली व मुलगी अचानक गायब झाल्याची तक्रारही पोलिसात नोंदवली. त्याचबरोबर मुलगी कोणी नेली असावी याबाबत संशयितांची नावेही नेकनूर पान २ वर

टीडीएस नियमांचे उल्लंघन, आयकर विभागाची कारवाई

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- आयकर कायदा १९६१ अंतर्गत टीडीएस नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी छत्रपती संभाजी नगर येथील कापूस व्यापार करणाऱ्या एका कंपनीवर आयकर विभागाने मोठी कारवाई केली आहे. आयकर विभागाच्या टीडीएस पथकाने संबंधीत कंपनीच्या कार्यालयात सर्व्हे करत दिवसभर सखोल तपासणी केली. तपासा दरम्यान कंपनीने दिलेल्या व्याजावर लागू असलेला १०% टीडीएस कापला नसल्याचे तसेच पान २ वर

अमरनानांना उपनगराध्यक्ष पद दिले तर त्यात पंडितांचा आणि बीडच्या जनतेचाही फायदा

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- येथील नगर पालिकेची निवडणूक यंदा अनेक कारणांनी गाजली, त्यातील एक महत्वाचे कारण म्हणजे क्षीरसागर मुक्त नगर पालिका हे होते. विजयसिंह पंडितांच्या नेतृत्वाखाली पॅनलने बाजी मारली, प्रेमलताताई पारवे नगराध्यक्षा झाल्या. त्यामुळे बीडमध्ये पंडितांचे राजकीय वजन वाढले आहे. आता दीर्घकाळ त्यांना बीडमध्ये सत्ता करायची असेल तर अनुभवी, कर्तबगार असे कार्यकर्ते जोडणे गरजेचे आहे. दोन्ही क्षीरसागरांच्या विरुद्ध सडेतोड, प्रखरपणे बाजु मांडणारे अमर नाईकवाडे हे पंडितांसाठी फायद्याचे ठरु शकतात. नानांनी गेल्या १५ वर्षात केलेली कामे ही निश्चित जनतेच्या दृष्टीने महत्वाची होती. जनतेतूनही त्यांच्याच नावाची चर्चा होत आहे. त्यामुळे नाना हे पंडित आणि जनतेसाठी महत्वाचे आहेत. सध्या उपनगराध्यक्ष पदासाठी अमर नाईकवाडे यांच्यासह नगर सेवक विनोद मुळूक यांचेही नाव चर्चेत आहे परंतु यामध्ये अमर नाईकवाडेंचाच चेहरा जनतेच्या दृष्टीने जास्त प्रभावी वाटत आहे. विशेष म्हणजे अमर नाईकवाडे आणि फारुक पटेल हे सुरुवातीलाच माजी आ.अमरसिंह पंडित आणि आ.विजयसिंह पंडित यांच्याकडे गेलेले आहेत. इतरांचा प्रवेश हा योगेश क्षीरसागरांची भूमिका बदलल्यानंतर झालेला आहे.

बीड नगर पालिकेच्या उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक ही येत्या गुरुवारी म्हणजे १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीचा बीड नगर पालिकेवर वरचष्मा असल्याने उपनगराध्यक्ष पद त्यांच्याकडेच राहणार हे स्पष्ट झालेले आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीकडून उपनगराध्यक्ष पदासाठी तिसऱ्यांदा विजयी झालेले अमरनाना नाईकवाडे आणि विनोद मुळूक या दोघांच्या नावाची चर्चा आहे. विनोद मुळूक हे चौथ्यांदा निवडूण आलेले आहेत. दोघांचाही राजकीय प्रवास २००६ मध्ये सुरु झाला. पहिल्या निवडणुकीत अमरनाना यांच्या मातोश्री एका मताने पराभूत झालेल्या होत्या. दोघांच्या कामकाजावर प्रकाश टाकला असता अमरनानांनी मागच्या १५-२० वर्षात वार्डातील आणि बीड शहरातील विविध समस्या, विकास कामे या संदर्भात पालिकेत आवाज उठविलेला आहे. कोविडच्या कालावधीत नानांचे काम हे केवळ वार्डासाठी मर्यादित नव्हते तर संपूर्ण जिल्ह्यासाठी होते. पटेल आणि नाईकवाडे यांनी कोविडमध्ये स्वत:चे जीव धोक्यात घालून अनेकांना जीवदान दिले, त्याची पावती म्हणून नानांना त्यांच्या वार्डात जनतेने १५५४ मतांच्या मोठ्या मताधिक्याने विजयी केले आहे. संपूर्ण बीड जिल्ह्यात वार्ड क्रमांक ३ ची चर्चा होती. काका की नाना ? असा एकच विषय चर्चिला जात होता. नानांना पराभूत करण्यासाठी आमदारांपासून अनेकांनी ताकद लावली होती परंतु त्यांचे मताधिक्य मोठ्या प्रमाणात वाढले, यावरुन लोकांनी जात,पात, पक्ष न पाहता कामाला पाहून मतदान केले हे दिसून आले. अमरनाना स्वत: निवडूण आलेच पान २ वर

राष्ट्रवादीच्या १९ पैकी फारुक पटेल यांच्यासह १२ नगर सेवक नानांच्या बाजुने

उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक ही बहुमताने होते. बीड नगर पालिकेमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १९ नगर सेवक निवडूण आलेले आहेत. मित्र पक्षांच्या साह्याने ते उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक सहज जिंकू शकतात असे बोलले जात आहे. घड्याळ्याच्या १९ नगर सेवकांपैकी फारुक पटेल यांच्यासह जवळपास १२ नगर सेवक अमरनाना नाईकवाडे यांच्या उपाध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी सकारात्मक असल्याचा अंदाज आहे.

राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

नवी दिल्ली दि.१२ (प्रतिनिधी):- महापालिका निवडणुकांनंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार असून राज्याचं लक्ष तिकडे लागलं आहे. मात्र, निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणुकांसाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केली होती. अखेर, राज्य निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला असून जिल्हा परिषद पान २ वर

राजेंद्र काशीद यांना पितृशोक

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- सायं. दैनिक बीड रिपोर्टरचे व्यवस्थापक राजेंद्र काशीद यांचे वडील बबनराव भैरुबा काशीद यांचे दि.१२ जानेवारी रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.

मृत्यूसमयी त्यांचे वय १०४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पान २ वर

इस्रोच्या PSLV-C62 मोहिमेला धक्का

प्रक्षेपणानंतर रॉकेटवरील नियंत्रण सुटले, १६ उपग्रह अंतराळात हरपले

श्रीहरिकोटा दि.१२ (वृत्तसेवा):- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (ISRO) सोमवारी २०२६ मधील पहिल्या अंतराळ मोहिमेत मोठा धक्का बसला आहे. इस्रोच्या पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV-C62) मोहिमेदरम्यान प्रक्षेपणानंतर काही वेळातच तांत्रिक बिघाड झाला. रॉकेटच्या तिसऱ्या टप्प्यात (PS3 stage) पान २ वर

सोयाबीन,कापूस भाववाढ;शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश -राजेंद्र आमटे

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापूस पिकांना न्याय्य भाव मिळावा, या मागणीसाठी शेतकरी पुत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. आंदोलनाला यश मिळाल्यामुळे सोयाबीन व कापसाच्या दरात वाढ झाली असून, हा विजय शेतकरी, शेतकरी पुत्र आणि शेती मित्रांच्या एकजुटीचा असल्याचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी सांगितले.

बीड येथील संत तुकाराम महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरू झालेल्या कापूस व सोयाबीन भाववाढ आंदोलनाची माहिती मिडीयाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विधानसभेत पोहोचली आणि थेट शेतकऱ्यांना भाववाढ मिळवून देण्यात यश मिळाले. कापूस व सोयाबीन दरवाढीसाठी बीड जिल्ह्यातील सुमारे ७० ते ८० गावांमध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्रांच्या बैठका घेतल्या गेल्या. या बैठकीत व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण कसे होत आहे, याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. बैठकीत स्पष्ट करण्यात आले की, एका क्विंटल कापसापासून ७०० ते ८०० मीटर कापड, ५० किलो सरकी पेंड तसेच ८ ते १० लिटर तेल तयार होते. मात्र, शेतकऱ्याला केवळ सुमारे ७ हजार रुपये मिळतात, तर व्यापाऱ्यांना यावरून ७० ते ८० हजार रुपये नफा होतो. तसेच, एका क्विंटल सोयाबीनपासून ७०० ते ८०० लिटर सोया दूध तयार पान २ वर

मंजरथ येथील राख लिलाव प्रकरण रद्द करण्यासाठी ६ तास आंदोलन

- **आंदोलक लेकराबाळा सह नदी पात्रात**
- **लेखी आश्वासना नंतर आंदोलन मागे**

माजलगाव दि.१२ (प्रतिनिधी):- तालुक्यातील मंजरथ ग्रामपंचायतने गोदावरी नदीपात्रात होणाऱ्या राख व्यवसायाचे सरपंच व ग्रामसेवकाने संगनमताने टेंडर काढले होते ते तात्काळ रद्द करावे या साठी काल सुमारे ६ तास आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेत लेकराबाळा सहित नदीपात्रात जलसमाधी घेण्यासाठी उतरले होते अखेर ग्रामपंचायत प्रशासन नमले असून सदरील टेंडरला स्थगिती दिले असल्याने हे जलसमाधी आंदोलन तूर्त मागे घेतले आहे.

माजलगाव पासून १० कि.मी. अंतरावर मंजरथ हे तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी अंत्यसंस्कार नंतरची राख (रक्षा)विसर्जन करण्याची हिंदु धर्मात परंपरा आहे त्या राखेचे ग्रामपंचायत कार्यालय गोदावरी नदी येथे पात्रातील दशविधी (रक्षा) लिलाव काढले आहे. या लिलावामुळे गावातील व पारंपारिक वडिलोपार्जित काम करणाऱ्या लोकांवर उपासमारीची वेळ येत आहे. यामुळे मंजरथ गावची संस्कृती व परंपरा मोडीस येत आहे, पान २ वर

भल्या पहाटे बीडचे तहसिलदार शेळकेंची चोरट्या वाळू वाहतुकीवर कारवाई

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील साक्षाळपिंप्री येथे सिंदफणा नदीपात्रातून अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू वाहतुकी विरोधात महसूल प्रशासनाने धडक कारवाई करत दोन ट्रॅक्टरवर कार्यवाही केली आहे . ही कारवाई १२ जानेवारी रोजी पारगाव सिरस महसूल मंडळाच्या हद्दीत साक्षाळपिंपरी येथे करण्यात आली.

पहिल्या घटनेत महसूल पथकाने अफसर शेख याचे ट्रॅक्टर अडवले असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले . सदर वाळू सिंदफणा नदीपात्रातून चोरट्या पद्धतीने उपसा करून वाहतूक करण्यात येत होती. तहसीलदार शेळके यांच्यासह महसूल कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर थांबवून कागदपत्रांची मागणी केली असता कोणतेही वैध परवाने अथवा रॉयल्टी पावती सादर करण्यात आली नाही . कारवाई दरम्यान संबंधित आरोपी अफसर शेख याने महसूल कर्मचाऱ्यांची दिशाभूल करून ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेले . पान २ वर

पैठण - पंढरपूर पालखी मार्गाचे काम ३१ मार्च २६ पर्यंत करा

उच्च न्यायालयाची मुदतवाढ

पाटोदा दि.१२ (प्रतिनिधी):- पैठण- पंढरपूर पालखी मार्गाचे काम रखडले असून हे काम २६ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करावे त्यानंतर कुठल्याही प्रकारची मुदत वाढ मिळणार नाही असे उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या न्यायालयाने स्पष्ट करून वाढीव मुदतीत काम न केल्यास याचिकाकर्ते यांना अवमान याचिका चालवण्याची मुभा देण्यात आली आहे न्यायालयाच्या या आदेशामुळे पैठण पंढरपूर या महामार्गाचे रखडलेले काम पूर्णत्वास जाईल असे वाटते

ॲड.नरसिंह जाधव

बहुचर्चित पैठण पंढरपूर पालखी मार्ग पैठण ते शिरूर कासार पॅकेज नंबर १५५.९३७ किलोमीटर खर्च ३४१.८० कोटी शिरूर कासार ते खर्डा पॅकेज नंबर २५४.१०९ किलोमीटर किंमत ३८१.७७ कोटी काम २०१७ रोजी मंजूर होऊन सदरील काम १ जून २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. टप्पा क्रमांक चे काम M/S RCM Infra Ltd.& P V Ramanaiah & co.(Joint Venture) Hyderabad व टप्पा क्रमांक २ चे काम पान २ वर

आष्टी मतदार संघामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्तीमध्ये सावळा गोंधळ

राष्ट्रवादी काँग्रेसचे आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यामध्ये प्रत्येक गावागावात निवडणूक कर्तव्य करण्यासाठी पूर्व नियोजन म्हणजे मतदान केंद्रावर मतदान केंद्र अधिकारी म्हणून सध्या सर्वत्र नियुक्ती केल्या जात आहेत. नैसर्गिक न्यायाने जो कर्मचारी ज्या महसुली गावामध्ये कार्यरत आहे त्या ठिकाणी त्याला बी एल ओ म्हणून नियुक्ती देणे ठीक आहे परंतु जो कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी बीएलओ म्हणून नियुक्ती न देता दुसऱ्याच गावामध्ये त्याला नियुक्ती पान २ वर

पान १ वरून

धनंजय मुंडेंच्या मंत्री पदाचे संकेत

येतील, असे वक्तव्य करुन प्रफुल्ल पटेल हे धनंजय मुंडे यांना थांबविण्याचा तर प्रयत्न करीत नाहीत ना? अशी चर्चा आता सुरु झाली आहे. धनंजय मुंडेंची नाराजी दूर करण्यासाठी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून प्रयत्न केले जात असल्याचे समजते.

अमरनानांना उपनगराध्यक्ष पद दिले तर...

परंतु साखळीतील घड्याळीच्या उमेदवार रेश्मा रामदास सरवदे यांनाही ११५० मतांनी निवडून आणले. नानांचा वार्ड तसा भाजपच्या विचारसरणीचा परंतु तरी देखील या वार्डमधून घड्याळाच्या प्रेमलताताई पारवे यांना १६७० मते मिळाली आहेत. त्या ठिकाणी कमळाच्या उमेदवाराला २००० मते मिळाली. या तुलनेत अमरनानांनी भाजपच्या बरोबरीत घडीला मतदान मिळवून दिले. दुसरीकडे मुळूक यांच्या वार्डाचा विचार करता ते ३५० मतांनी विजयी झाले. मात्र त्यांना साखळीतला उमेदवार निवडून आणता आला नाही. या वार्डात नगराध्यक्ष पदाच्या भाजपच्या उमेदवारास १६३४, तुतारीच्या उमेदवारास ९३० तर घडीच्या उमेदवाराला केवळ ८७४ मते मिळाली. त्यांच्या वार्डात घडी तिसऱ्या नंबरवर राहिली. तर साखळीत घड्याळाचा उमेदवार पराभूत होऊन भाजपचे उमेदवार विजयी झाले. विनोद मुळूक यांच्या कुटुंबातील दोन सदस्य क्षीरसागरांच्याच संस्थेवर नोकरीला आहेत. दोघांचाही विचार केल्यास त्यामध्ये अमरनानाच उपनगराध्यक्ष मेरीटवर असल्याचे जनतेत बोलले जात आहे. अमरनानांचा बेस हा क्षीरसागर विरोधी आहे, पटेल आणि नाना यांच्या नेतृत्वाला संघर्षाची देण आहे. २०१६ मध्ये झालेल्या नगर पालिका निवडणुकीत काकु-नाना विकास आघाडीची पूर्ण जबाबदारी पटेल आणि अमरनानांच्या खांद्यावर होती. पायाला भिंगरी लावल्या प्रमाणे दोघेही शहरात फिरले त्यामुळेच काकु-नाना विकास आघाडीचे त्यावेळी २० नगर सेवक निवडून आले होते. आमदारांच्या विजयातही पटेल आणि नाईकवाडेंचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. मध्यंतरी राजकीय समीकरणे बदलल्यानंतर अमरनाना आणि पटेल सर्वात आधी माजी आ.अमरसिंह पंडित आणि आ.विजयसिंह पंडित यांच्याशी जोडले गेले त्यानंतर बाकीचे लोक त्यांच्याकडे आले. तिथून पुढेच क्षीरसागर मुक्तीचा प्रवास सुरु झाला. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष म्हणून सुद्धा अमर नाईकवाडेंची कामगिरी उल्लेखनीय ठरली. ज्यावेळी डॉ.योगेश क्षीरसागरांनी नवगण कॉलेजमध्ये इच्छुकांची बैठक घेतली त्यानंतर लगेचच अमर नाईकवाडेंनी पक्षाच्या जिल्हा कार्यालयात अधिकृत बैठक घेतली. माजी आ.अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित यांच्यासह पक्षनिरीक्षक संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ३०० इच्छुकांचे फार्म भरुन घेतले. त्यामुळे ऐनवेळी उमेदवार शोधण्याची वेळ पक्षावर आली नाही. आ.विजयसिंह पंडित यांचे नेतृत्व उल्लेखनीय आणि विजयासाठी महत्वाचे ठरले. अमर नाईकवाडेंनी नगर सेवक म्हणून आणि पक्ष स्तरावरही संघटनेचे केलेले काम मोठे फायद्याचे ठरले. २०११ पासून नाईकवाडे आणि पटेल दोघे संघर्ष करत आहेत. आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वात हे सर्व शक्य झाले, त्यामुळे आता उपनगराध्यक्ष पदासाठी अमरनाना हाच चेहरा अधिक प्रभावी आणि सक्षम ठरु शकतो असे जनतेतून बोलले जात आहे. अमरनानांचे उपनगराध्यक्ष पद हे भविष्यात पंडितांसह बीडमधील जनतेच्याही फायद्याचे ठरु शकते.

जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

निवडणुकांसाठी दोन आठवड्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. राज्यातील जिल्हा परिषद जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्या, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडून सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आला होता. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वेळ दिली होती. मात्र, राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांमध्ये आरक्षण आहे. तर इतर २० जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली असल्यामुळे त्याविषयी काय निर्णय होणार, यावर प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान यावर आज (१२ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली.

या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका पुढे ढकलण्यास परवानगी दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे, आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे निर्देश कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत.

गायब झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध नेकनूर पोलिसांना लागेना...

पोलिसांना सांगितले.त्यानंतर याबाबत आम्ही तपास करत आहोत लवकरच आम्ही या मुलीचा शोध घेऊ असे नेकनूर पोलिसांकडून सांगण्यात येत होते याबद्दल मुलीचे नातेवाईक दररोज पोलीस स्टेशनला येऊन फॉलोअपही घेत होते. परंतु प्रत्येक दिवशी नेकनूर पोलिसांकडून एकच उत्तर ऐकावयास मिळत होते ते म्हणजे उद्यापर्यंत आपल्याला काहीतरी सुगावा लागेल मुलीच्या आईची तब्येत खलावत असल्याने एक दिवस मुलीच्या आई-वडिलांसह इतर नातेवाईक पोलीस स्टेशनमध्ये येऊन बसलेही परंतु आम्ही लवकरात लवकर तुमच्या मुलीचा शोध लावू असे आश्वासन दिल्यानंतर त्या मुलीच्या आई-वडील व नातेवाईकांना परत पाठवण्यात आले व तुम्ही आज घरी जा आम्ही दोन दिवसात किंवा चार दिवसात नक्की शोध लावू हेच उत्तर गेल्या सव्वा महिन्यांपासून नेकनूर पोलिसांकडून ऐकावयास मिळत असल्याने नेमका त्या मुलीचा शोध का लागत नाही? मुलीच्या आई-वडिलांनी ज्यांच्याबद्दल संशय व्यक्त केला आहे त्या लोकांना पोलीस स्टेशनला आणून त्यांच्याकडून का चौकशी केली जात नाही? मग मुलीचा शोधच लागत नाही, की नेकनूर पोलिसांनाच शोध लावायचा नाही याबाबत मात्र मुलीचे आई-वडील व नातेवाईकांमधून नेकनूर पोलिसांबद्दल शंका व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या सव्वा महिन्यांपासून दररोज उडवा उडवीची उत्तरे मिळत असल्याने जाने कोणी या मुलीला पळवून नेले आहे याबाबत पोलिसांना माहिती असूनही ते लपवाछपी करत आहेत की काय? किंवा या मुलीचा काही घातपात झाला की काय? या बाबत शंका उपस्थित करण्यात येत आहे व नेकनूर पोलिसांकडून याबाबत काहीच हालचाली केल्या जात नसल्याने व प्रत्येक दिवशी एकच उत्तर मिळत असल्याने मुलीच्या आई वडील व नातेवाईकांमधून नेकनूर पोलिसांवरच संशय व्यक्त केला जात आहे.

टीडीएस नियमांचे उल्लंघन...

इतर व्यवहारावर कापलेला टीडीएस केंद्र सरकारच्या खात्यात जमा न केल्याचे गंभीर प्रकरण उघडकीस आले आहे. आयकर कायदा १९६१ च्या कलम १९४ ए नुसार कोणत्याही कंपनीने व्याज अदा करतांना १०% टीडीएस कपात करणे बंधनकारक आहे. मात्र संबंधीत कंपनीने सुमारे २० कोटी रुपयांच्या व्याजावर टीडीएस कपात केला नाही, तसेच इतर व्यवहारांमधून कापलेला ७१ लाख रुपयांचा टीडीएस सरकारकडे जमा केला नसल्याचे समोर आले आहे. सर्वेक्षणाच्या कालावधीत संबंधीत रक्कम व्याजासह वसुल करण्याची कारवाई आयकर विभागाने केली. दरम्यान आयकर विभागाने सर्व व्यापारी, उद्योजक व करदात्यांना आयकर कायद्यातील टीडीएस संदर्भात सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे, उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

राजेंद्र काशिद यांना पितृशोक...

नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवदेहावर दुपारी ३ वाजता मोंढा रोड, अमरधाम या ठिकाणी अंत्यविधी करण्यात आले. काशीद कुटुंबियाच्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

इस्त्रोच्या मोहिमेला धक्का...

अखेरच्या क्षणी मार्गात विचलन (deviation) आढळून आले. ज्यामुळे अपेक्षित कक्षेत (ऑर्बिट) जाणे शक्य झाले नाही. परिणामी या मोहिमेत पाठवण्यात आलेले सर्व १६ उपग्रह अंतराळात हरपले.

"PSLV-C62 मोहिमेदरम्यान PS3 टप्प्याच्या शेवटी तांत्रिक अडथळा निर्माण झाला. या संदर्भात सविस्तर विश्लेषण सुरू करण्यात आले आहे.'' असे, इस्रोने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर माहिती देताना सांगितले आहे. ही मोहीम इस्रोची २०२६ मधील पहिली अंतराळ मोहीम होती. या अंतर्गत EOS-N1 (अन्वेषा) हा प्रमुख उपग्रह, १४ सहप्रवासी उपग्रह आणि एक री-एंट्री कॅप्सूल अवकाशात पाठवण्यात आले होते.

तहसिलदारांची चोरट्या वाळूवर कारवाई

या बाबत पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.त्यानंतर लगेचच त्याच परिसरात दुसरे एक ट्रॅक्टर महसूल पथकाच्या निदर्शनास आले . सदर ट्रॅक्टर सुनील बेदरे यांचे असल्याचे निष्पन्न झाले . तपासणी दरम्यान या ट्रॅक्टरमधूनही अवैधरित्या वाळू वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले . या प्रकरणी महसूल पथकाने ट्रॅक्टर व ट्रॉली ताब्यात घेतली असून , चालक व मालकाविरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या सातत्यपूर्ण सूचनांनुसार गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर कठोर कारवाया करण्यात येत आहेत. बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अवैध वाळू वाहतुकीवर शून्य सहनशीलतेचे धोरण राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्याकडून याबाबत नियमित आढावा घेतला जात असून , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचा मंडळाधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे सातत्याने तगादा असतो .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या अवैध चोरट्या वाहतुकीविरोधात सक्रिय असून , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्यात कुठेही अवैधरित्या वाळू वाहतूक खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे .

या कारवाईत पारगाव सिरस विभागाच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप व दादासाहेब शेळके तसेच महसूल सहायक भरत भंडाणे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

महसूल प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून , पुढील काळातही अशा प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे .

मंजरथ येथील राख लिलाव प्रकरण...

याने लोकांची श्रद्धा भावना दुखावल्या जात आहेत व ग्रामस्थ पारंपारिक रक्षा चालून उपजिविका भागवणाऱ्या लोकांची उपासमार होत आहे.

त्यामुळे हा जुलमी व बेकायदेशीर लिलाव तात्काळ रद्द करावा यासाठी दि.१२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मंजरथ येथील गोदावरी नदी पात्रात भीमाराव कदम, रामनाथ चुंबळे, अनिल चुंबळे , अर्जुन जाधव, इसाक बेग , महानंदा कचरे , करुणा चौरे , अरुणा शिंदे , छाया टाकणखार सह लहान मुलं , वृद्ध महिला व नागरी जलसमाधी घेण्यासाठी नदीपात्रात उतरले होते दरम्यान हे राख तात्काळ रद्द करावे असा ठाम पवित्रा घेत प्रशासनाला धारेवर धरले होते शेवटी ग्रामपंचायत कार्यालय नमले आणि त्यांनी त्यांच्या त्या निर्णयाला लेखी स्थगिती दिल्याने सुमारे सहा तास चाललेले हे जलसमाधी आंदोलन मागे घेण्यात आले. या वेळी ग्रामीण पोलिस स्टेशन चे पो नी बालक कोळी , ए.पी. आय गोविंदा पांडव, गट विकास अधिकारी ज्योत्सना मुळीक , विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड तलाठी भारत भटे व ग्रामसेवक खेत्रे आदी प्रशासकीय अधिकारी यांच्या सह आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे अशोक ढगे आदी ची उपस्थिती होती आंदोलन ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त , अग्निशमन दल व वैद्यकीय सेवा तैनात करण्यात आली होती.

शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश

होते. ऑनलाईन विक्री संकेतस्थळांवर सोया दुधाचा दर प्रतिलिटर सुमारे १२० रुपये असल्याने व्यापाऱ्यांना ७५ ते ८५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न होते, तर शेतकऱ्याला अत्यल्प दर मिळतो.

जनजागृतीनंतर शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना भाववाढ न केल्यास कापूस न देण्याचा निर्णय घेतला, तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवर माल तात्पुरते थांबवला. परिणामी बाजारात कापूस व सोयाबीनचा तुटवडा निर्माण झाला, ज्यामुळे व्यापाऱ्यांना अखेर कापूस व सोयाबीनचे दर वाढवावे लागले. या लढ्यात शासनाने कापूस आयातीवर व्यापाऱ्यांना कर सूट थांबवले, ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक फायदा झाला.

राजेंद्र आमटे यांनी सांगितले की, हा यशस्वी लढा शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या एकजुटीचा आहे. या आंदोलनास माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, कुलदीप करपे, सुहास जायभाय, राजू गायके, बाळासाहेब मोरे पाटील, गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, दिनेश गुळवे, धनंजय मुळे, नयना भाकरे, हिराबाई कांबळे, अंकुश सातपुते, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, गणेश मस्के, संगमेश्वर आंधळकर, भास्कर खंडे, रामधन जमाले, दत्ता प्रभाळे, खाजाभाई पठाण, राहुल साळुंके, संतोष शिंदे, श्रीराम कोरडे, श्रीकांत गदळे, सुरेश गरड, अप्पा डाके, आप्पासाहेब महानोर, हनुमान घोडके यांचा सक्रिय पाठिंबा लाभला.

आष्टी मतदार संघात नियुक्तीत गोंधळ...

दिली जाते यामागे नेमके राजकारण काय आहे याची चर्चा आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात होत आहे...

याविषयी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे विधानसभा अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी आष्टी तहसीलदार यांना लेखी निवेदनात सांगितले आहे की यापूर्वी नियमानुसार बी एल ओ यांचे नियुक्तीसाठी स्वतंत्र आदेश देण्यात आला होता परंतु त्यानंतर सुधारित बी एल ओ आदेश तयार करून मर्जीतील शिक्षक कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ नोकरीच्या ठिकाणचे आदेश न देता त्यांना विशिष्ट राजकीय उद्देशाने नोकरी नसलेल्या ठिकाणी देण्यात आलेले आहेत यामध्ये कर्मचाऱ्यात आणि सामान्य नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे की सध्या मतदारसंघात नेमकँ महसूल प्रशासन कोण चालवतोय????

कर्मचाऱ्यांना मूळ नोकरीच्या ठिकाणी असलेल्या ठिकाणी बी एल ओ आदेश देऊन त्यांचे रजिस्ट्रेशन करून कामकाजात सुरुवात केली होती परंतु सुधारित आदेश अन्वये सगळं सावळा गोंधळ कोणी आणि कोणाच्या सांगण्यावरून केला याबाबत चर्चा सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे राम खाडे यांनी लेखी निवेदन देऊन याबाबत निवडणूक आयोगाकडे गंभीर प्रकारची तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे या लेखी निवेदनाच्या प्रती मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हाधिकारी बीड यांना दिले आहेत.

पैठण-पंढरपुर पालखी मार्गाचे काम...

M/S Madhucon Projects Ltd.- Sharda construction- Satya saibaba construction (Joint Venture) कंपनी यांना देण्यात आले होते वरील काम ईस्टीममेट प्रमाणे होणे अपेक्षित असतांना अत्यंत निष्कृष्ट दर्जाचे काम करण्यात आले होते. तसेच अनेक ठिकाणी जमीन अधिग्रहणाच्या नावाखाली रस्त्याचे काम करण्यात आले नाही. अनेक ठिकाणी पुलाचे काम देखील करण्यात आले नाही. पाटोदा येथील मांजरा नदीवरील पूल व डोंगरकिनी येथील पुलाचे बांधकाम अध्यापर्यंत करण्यात आलेले नाहीत. सदरील मार्ग राक्षसभुवन, कारेगाव, चुंबळीघाट पाटोदा शहर असे अनेक ठिकाणी अपूर्ण काम झाल्यामुळे नागरिकांना धुळीचा त्रास, अपघात या सर्व गोष्टींना सामोरे जावे लागत होते. नागरिकांनी वारंवार निवेदने देऊन मोर्चे काढून, आंदोलने करून सदरील काम त्वरित पूर्ण करावी अशी मागणी करूनही व लोकप्रतिनिधीच्या हलगर्जीपणामुळे देखील रस्त्याचे काम पूर्ण होत नसल्यामुळे कॉम्रेड महादेव नाना नागरगोजे, ह.भ.प रंधवे बाप्पू व चक्रपाणी लक्ष्मणराव जाधव यांनी ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव मार्फत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये जनहितार्थ याचिका क्र. २२/२०२४ दाखल केली होती. सदरील याचिकेची सुनावणी होऊन सदरील काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना दिले होते. परंतु मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर देखील थोड्याफार ठिकाणी रस्त्याचे काम करण्यात आले व उर्वरित काम पुर्ण करण्यासाठी जमीन अधिग्रहण व इतर काही कारणे सांगून सदरील काम पूर्ण करण्यासाठी ३१ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी यासाठी राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्या वतीने मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये दिवाणी अर्ज क्र.९८/२०२५ दाखल करण्यात आला होता. सदरील अर्जाला याचिका करते कॉम्रेड महादेव नाना नागरगोजे व इतर यांच्यावतीने ॲड. नरसिंह ल. जाधव यांनी हरकत घेऊन सदरील प्रकरणात काम पूर्ण करण्यासाठी यापूर्वी पुरेसा वेळ दिलेला असून न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे काम न केल्यामुळे संबंधितावर अवमान याचिका दाखल केल्याचे मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच सदरील विलंबा बाबत पुरेसे कारणे देखील दिले नसल्याचे नमूद केले.

सदरील याचिकेची सुनावणी दि.२२-१२-२०२५ रोजी झाली असता मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विभा कांकणवाडी व न्यायमूर्ती हितेन वेनेगावकर यांच्या पुढे झाली असत्ता मा.न्यायालयाने पैठण पंढरपूर पालखी मार्गाचे काम ३१ मार्च २०२६ च्या पूर्वी पूर्ण करावे व त्यानंतर कुठल्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही असे न्यायालयाने स्पष्ट करून वाढीव मुदतीच्या आत काम न केल्यास याचिका करते यांना अवमान याचिका चालवण्याची मुभा दिलेली आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने शपथपत्राबरोबर सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये प्राधिकरणाच्या वतीने संबंधित ठेकेदार यांना दिलेल्या करार रद्द करण्याबाबत नोटीस मध्ये सदरील काम हे ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे व निष्कृष्ट कामामुळे विलंब झाल्याचे नमूद आहे. तसेच पाटोदा व डोंगरकिनी येथील पुलाचे बांधकाम देखील झाले नसल्याचे नमूद असून टोल प्लाझाचे काम अपूर्ण असल्याचे नमूद आहे. तसेच अनेक ठिकाणी इस्टिमेट प्रमाणे दर्जेदार काम न झाल्याचे नमूद आहे.

याचिकाकर्ते यांच्या वतीने ड. नरसिंह ल. जाधव यांनी काम पहिले त्यांना ड.गौरव शिवाजी खांडे यांनी सहकार्य केले. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने ड. राजेंद्र सानप यांनी काम पहिले.

पान ६ वरून

बहुचर्चित कडा रेल्वे उड्डाणपूलाच्या कामाला सुरुवात

अखेर नागरिकांच्या पाठपुराव्याला यश आले असून नवीन वर्षाच्या सुरवातीपासूनच पिलरसाठी खड्डे खोदण्याच्या ठिकाणी फलक लावण्यात आले आहेत. या उड्डाणपुलामुळे कडेकरांचा प्रवास सुलभ, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे.या उड्डाण पूलच्या कामाला सुरुवात झाली असून हा पुल ५८० मीटर लांबीचा असणार आहे.

पोलिसांच्या सतर्कतेने चौकशीसाठी ताब्यात घेतलेला निघाला गुन्हेगार

करणे, खुनाचा प्रयत्न करणे, रात्री घरफोडी करणे, चोरी करणे अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान व चालक फिरोज पठाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील तपास पोलीस हवालदार बबन जाधव करत आहेत.

वडवणी तालुका संघटनेच्या

गिराम, देवइ सुदामराव, महिला प्रतिनिधी म्हणून सोनवणे आर के, याप्रमाणे तालुका संघटनेची नवनिर्वाचित कार्यकारणी निर्माण करण्यात आली, यावेळी संघटनेचे पदाधिकारी खोसे शिवाजी मोहनराव, यशवंत एस.टी., पवार बी पी, मुंडे सचिन फुलचंद , बिरले पी.आर. शिंदे भरत दगडू, आर्वी वैजनाथ जाधव, सोनवणे आर के, काळे पी एस, भदरगे राजरतन, मसवले , खाडे एफ.सी, शेळके आय व्ही, गिराम डी.एस., मारकड बी.जी, इत्यादी सभासद उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष , उपाध्यक्ष, सचिव व सभासदांचा हृदय सत्कार करण्यात आला.

अपात्र लाडक्या बहिणींना पुन्हा ई-केवायसीची संधी द्या-जे.डी.शाह

केले आहे. त्यामुळे, ई-केवायसी करताना शासकीय कर्मचारी असा पर्याय निवडल्यामुळे नकार मि ळालेल्या महिलांना पुन्हा एकदा ई-केवायसी करण्याची विशेष संधी देण्यात यावी. तसेच ज्या पात्र महिलांची ई-केवायसी प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे, त्यांना मुदतवाढ देऊन ती पूर्ण करण्याची संधी देण्यात यावी, अशी नम्र विनंती त्यांनी केली आहे. सदर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करण्यात यावी व संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात, जेणेकरून कोणतीही पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असे समाजसेवक जे.डी.शाह यांनी आपल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे.

बीडच्या भूमिपुत्रासाठी आ.धस मुंबईच्या मैदानात

नवनाथ बन यांना संधी दिल्यास हा आवाज थेट महानगरपालिकेत पोहोचेल, असे सांगत आमदार सुरेश धस यांनी भाजप-शिवसेना (शिंदे गट)च्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले. विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांपूर्वी पुणे व पिंपरी-चिंचवड येथे जाहीर सभा गाजवल्यानंतर सोमवारी थेट मुंबईत येऊन आपल्या बीड जिल्ह्यातील भूमिपुत्रासाठी प्रचार करणे ही आमदार सुरेश धस यांची भूमिका कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारी ठरली. त्यांच्या उपस्थितीमुळे परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. या प्रचार मोहिमेदरम्यान भाजप व शिवसेना (शिंदे गट)चे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आगामी महानगरपालिका निवडणुकीत वॉर्ड क्रमांक १३५ मध्ये भाजप-युतीला घवघवीत यश मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

संत रविदास महाराज जयंती

यावेळी सर्वानुमते बीड जयंतीच्या अध्यक्षपदी राजु उनवणे यांची निवड करण्यात आली आहे. प्रतिवर्षी प्रमाणे बीड शहरात संत रविदास महाराज व वीर कंकय्या महाराज यांची संयुक्त मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी नुकतेच बीड येथील विश्रामगृहात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड सल्लागार दासराव जी गोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती बीड अध्यक्षपदी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राजु उनवणे यांची एकमताने निवड झाली.तर उपाध्यक्षपदी सुरेश मराठे, सचिव आनंद कांबळे, कोषाध्यक्ष हनुमान सोनवणे, सल्लागारपदी पप्पु शेठ मराठे यांची यावेळी निवड करण्यात आली. विशेष उपस्थिती सर्जेराव तात्या तांदळे या बैठकीसाठी उपस्थिती लाभली. या बैठकीस राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा माने, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनील माने, मीडिया प्रमुख हारीदास तावरे, सुभाष गायकवाड, पांडुरंग रामगुडे, संजय भगत, सुर्यकांत तांदळे, कचरू पाखरे, किरण राजगीरे यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण उनवणे सर यांनी केले आणि या प्रसंगी सर्जेराव तात्या तांदळे यांनी निवड झालेल्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.

निवासी शिबिरातून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडते -डॉ.अरुण दैतकर

आधारित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी विशेष शिबिराचे दि. २८ डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप सोमवार, बालग्राम, गोविंदवाडी, मन्यारवाडी ता. गेवराई येथे संपन्न झाला.

या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दीपक आतकरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना बीड जिल्हा समन्वयक डॉ. अरुण दैतकर हे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दिनेश घोडके, सहारा बालग्राम अनाथालयाचे संचालक प्रिती व संतोष गर्जे, सरपंच गांधारीबाई पवार, ग्रामस्थ बाबासाहेब डिंगरे यांची उपस्थिती होती. समारोप समारंभात मान्यवरांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक करून युवकांनी शाश्वत विकासासाठी पुढाकार घ्यावा असे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात कार्यक्रमाधिकारी, स्वयंसेवक व प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण जाधव यांनी प्रास्ताविक केले. स्वयंसेवक दिशा सपकाळ हिने सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रतिनिधी पूजा जाधव, प्रणव गिरी, स्वयंसेवक प्राची अर्डे, कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश सुर्यवंशी यांनी प्रातिनिधिक मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाधिकारी प्रा. सुरेश ढाकणे यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बालाजी रुपनर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नवनाथ गोरे, पर्यवेक्षक आशिष वाघुंबरे, प्रबंधक भास्कर सुरवसे, बीड जिल्हा सांस्कृतिक समन्वयक डॉ. समाधान इंगळे, प्रा. शरद सदाफुले यांच्यासह ग्रामस्थ, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्हा राष्ट्रवादी युवक जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत नाना नवले, किशोर आप्पा पिंगळे, रवींद्र शिंगारे, गोविंद घुंबरे, दीपक वाघमारे यांनी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करताना

सौ.सुनंदा राजेंद्र जगताप यांचे निधन

बीड दि.१२(प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील मुर्शदपूर येथील मूळ रहिवासी व सध्या शिवाजी विद्यालया जवळील त्वरिता कॉलनी येथे वास्तव्यास असलेल्या सौ. सुनंदा राजेंद्र जगताप (वय ६८) यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्या श्री राजेंद्र संतराम जगताप यांच्या पत्नी तसेच श्री प्रवीण राजेंद्र जगताप यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्वरिता देवी कॉलनी व मुर्शदपूर परिसरात शोककळा पसरली.

सौ. सुनंदा जगताप या अतिशय शांत, संयमी व धार्मिक वृत्तीच्या होत्या. साधू-संतांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता. सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सकारात्मक सहभाग राहिला. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मुर्शदपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी बीड आणि मुर्शिदपूर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते कार्यकर्ते यांच्यासह डॉक्टर, इंजिनीयर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे.जगताप परिवाराच्या दु:खामध्ये परिवार सहभागी आहे.

राजमाता जिजाऊ महिलांच्या स्वाभिमानाचे प्रतीक

- उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख-

पाटोदा दि.१२ (प्रतिनिधी):- राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मातेने दिलेले संस्कार, कर्तृत्व आणि स्वाभिमानाची शिकवण आजही समाजाला दिशा देणारी आहे. महिलांच्या स्वाभिमानाचे व कर्तृत्वाचे प्रतीक म्हणून राजमाता जिजाऊ यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहिले आहे, असे प्रतिपादन पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी केले.पाटोदा येथील उपविभागीय कार्यालयात राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मातेच्या जयंतीनिमित्त तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दिनांक १२ जानेवारी रोजी करण्यात आले होते. यावेळी राजमाता जिजाऊ मातेच्या आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने हिंदवी स्वराज्याचे तेजस्वी स्वप्न साकारोजीणारा महान नेतृत्वगुणांचा दीपस्तंभ घडविला. त्यांच्या संस्कारातून निर्माण झालेली पिढी आजही राष्ट्रनिर्मितीचा पाया ठरत आहे. तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनी युवकांमध्ये आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण केली, असेही यावेळी नमूद करण्यात आले.या अभिवादन कार्यक्रमास उपविभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या थोर राष्ट्रपुरुषांच्या विचारांना आचरणात आणण्याचा संकल्प व्यक्त केला.

रेन्यू पॉवर कंपनीची मनमानी

संमती न घेता वहीती शेतात उभे केले विद्युत पोल

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- शेतकऱ्याची संमती न घेता सामूहिक शेती असलेल्या ठिकाणी पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या रेन्यू पॉवर या कँपनीचे बीड तालुक्यातील मोरगाव हद्दीमध्ये कार्यालय असून तेथील संबंधित गुत्तेदाराने मनमानी करत शेतकऱ्यांची पूर्ण परवानगी न घेता वहीत शेतामध्ये विद्युत पूल उभे केले असून ते पोल काढून टाकण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे सदर निवेदन संबंधित कँपनी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक, नेकानूर पोलीस स्टेशन तहसीलदार बीड यांना दिले आहे.

खंडाळा तालुका बीड येथील शेतकरी विलास नरहरी चौरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्या रिन्यू पावर कँपनी ही सौर ऊर्जा (पवनचक्की) निर्माण करणारी कँपनी असून या कँपनीचे मोरगाव हद्दीमध्ये मांजरसुंबा लिंबागणेश रस्त्यावर कार्यालय असून या कँपनीने विद्युत लाईन ओढण्यासाठी काही कँत्राटदाराची नेमणूक केली आहे प्रामुख्याने ज्यांच्या वहीती असलेल्या शेतामधून किंवा मालकी हक्कातून पोल किंवा लाईन ओढली जाणार आहे त्यापूर्वी संबंधित शेतकऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक असताना या कँपनीने मनमानी करत गुत्तेदाराकरवी नियमबाह्यरित्या विद्युत पोल उभे केले आहेत विशेषत: हे पोल उभे करताना ज्या गटातून शेतातून विद्युत लाईन किंवा पॉल उभे केले जाणार आहेत त्या शेतकऱ्यांची संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही सामूहिक शेती असेल तर सर्वांची संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही विशेष म्हणजे यापूर्वीच गाव तलावासाठी आमची जमीन शासनाने संपादित केली आहे आणि आमच्या कुटुंबाची उपजीविका आता त्याच वहिती जमिनीवर असल्याने त्याच वहिती जमिनीवर मनमानी पद्धतीने रेन्यू पॉवर कँपनीने व त्यांच्या गुत्तेदाराने विद्युत पूल उभे केल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे भविष्यातही ही जमीन नापीक होऊ शकते तेव्हा माझ्या जमिनीमध्ये उभे केलेले रेन्यू कँपनीने विद्युत पोल त्वरित काढण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात केली आहे

प्रगटणाचे उत्तर

दै.पार्श्वभूमी मधील दिनांक १०/०१/२०२६ रोजी महावीर रसिकलालजी लोढा यांनी दिलेल्या प्रगटणाचे उत्तर खालील प्रमाणे

वर नमुद प्रगटनामध्ये गट क्र.२११ मधील क्षेत्र ५ हेक्टर ९८ आर जमीन १) मोहन विश्वनाथ पांडव, २) मधुसुदन मोहनराव पांडव, ३) मंगेश मोहनराव पांडव, ४) महेश मोहनराव पांडव यांनी विक्री करार केलेचा मजकुर चुकीचा व खोटा आहे. प्रगटणाचे उत्तर देणार यांनी त्यांची जमीन विक्री करणेचा कोणताही प्रश्न नाही तसेच जमीन विक्री करीता कोणतीही कायदेशीर अडचण नाही.

जाहीर प्रगटणाचे उत्तर देणार हे कोणलाही जमीन विक्री करण्याच्या प्रयत्नात नाहीत. दैनिक पार्श्वभूमी १०/०१/२०२६ रोजीचे जाहीर प्रगटन दिशाभूल करणे करीता दिलेले आहे. जाहीर प्रगटण देणार महावीर रसिकलालजी लोढा यांचे सोबत कोणताही कायदेशीर करार जमीन विक्री बद्दल झालेला नाही.

सबब हे प्रगटणाचे उत्तर.

दिनांक :- १२/०१/२०२६

ठिकाण :- बीड

मार्फत-
ॲड.अमोल नाटकर,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९०७५७१८१४३

- जाहीर प्रगटणाचे उत्तर देणार-
१) मोहन विश्वनाथ पांडव
२) मधुसुदन मोहनराव पांडव
३) मंगेश मोहनराव पांडव
४) महेश मोहनराव पांडव

16488-13425

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

पार्श्वभूमी

दिनांक १३ जानेवारी २०२६ पान -३

संतभूमी अर्बन शाखेत माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

चौसाळा दि १२ (प्रतिनिधी) -बीड तालुक्यातील चौसाळा येथे संतभूमी अर्बन बँकेच्या शाखेमध्ये राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना वक्त्यांनी सांगितले की, जिजाऊ माँसाहेब या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या पहिल्या शिल्पकार होत्या. या कार्यक्रमास संतभूमी अर्बन बँकेचे मॅनेजर सुदर्शन काळे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर, अजित साळुंखे, विकास सातपुते, महेश सातपुते, गोलेकर, गाडेकर, पाटील यांच्यासह परिसरातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

बीड -राष्ट्रमाता राजमाता आईसाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करतांना ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. विनायक जाधव, ॲड. नरेंद्र कुलकर्णी, ॲड. विष्णुपंत काळे, ऍड. मधुकर फलके, ॲड. बप्पासहेब वाघमोडे सह आदी..

इतर जिल्ह्यात उपसा करून वाळूची खुलेआम वाहतूक मग एकट्या बीड जिल्ह्यातच वर्षापासून कशासाठी बंदी?

बीड दि .१२ (प्रतिनिधी)- पावसाळ्याचे दिवस संपून गेले, हिवाळा देखील एक-दोन महिन्यात संपेल . जिल्ह्यातील मोठमोठ्या नद्यातील पाणी वाहने थांबू लागलं. काही दिवसातच या नद्या कोरड्या फट पडतील. जिल्हा प्रशासनानं मध्यंतरी वाळूबंदीचे जाहीर केलेले दिवस संपून गेले, तरी बीड जिल्ह्यातील वाळू काही मोकळी झाली नाही. ज्यांना तातडीने बांधकाम करायचे आहे त्यांनी क्रेशवर बांधकाम चालवलं. परंतु प्लास्टर साठी वाळू खुली होण्याची वाट पाहत आहेत. अनेकांनी आज ना उद्या वाळू सुटेल म्हणून बांधकाम स्थगित केलेले आहेत. ते देखील आता प्रशासनाच्या निर्णयाची वाट पाहत आहेत. परंतु वाळू काही सुटायला तयार नाही. महाराष्ट्रा मध्ये एकूण एक जिल्ह्यात बांधकामाला वाळू वापरली जाते. खूले अआम वाळूची वाहतूक होत असताना दिसून येते. परंतु बीड जिल्ह्यातच वाळू उपशाला व वाहतुकीला बंदी ?. बांधकाम करणारे व बांधकामावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे सर्वजण प्रशासन व लोकप्रतिनिधीच्या दुर्लक्ष संदर्भात संताप व्यक्त करू लागले आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र वाळू खोली असताना बीड जिल्ह्यातच का बंदी ? असा सवाल करून मंत्र्यापासून थेट यंत्रणेपर्यंत काहीतरी शिजलं गेलेलं आहे, असा स्पष्ट कयास करू लागले . वाळू बंदी असली तरी जिल्ह्यामध्ये मागेल त्याला वाळू मिळत आहे .मात्र यासाठी सोन्याचा भाव घेतला जात आहे. तेव्हा ही वाळू ,वाळू माफिया कुठून मिळवतात ? ती कशी आणले जाते ? हे आता लपून राहिलं नाही . जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचे या बाबीकडे का लक्ष नाही ?असा सवाल करून वाळू खूली करा अन्यथा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या विरोधात लोकांचा संताप ऊसळून येईल .अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जाऊ लागल्या आहेत.बीड जिल्ह्यामध्ये जवळपास एक वर्षापासून वाळू उपसा आणि वाहतुकीला बंदी केलेली आहे. ज्या व्यक्तींनी- नागरिकांनी वाळू बंदी होण्याअगोदर बांधकाम हाती घेतले त्यांचे बांधकाम अद्यापही रखडले असल्याचे दिसून येते. तर कित्येकाने वाळू भेटत नसल्याने क्रेशवर बांधकाम चालवले त्यांचे बांधकाम पूर्ण झाले किंवा पूर्णत्वास आले आहेत . यासंदर्भात मात्र घर बांधणारे , बांधकाम करणारे मजूर यांनी मात्र स्पष्ट प्रतिक्रिया व्यक्त करायला सुरुवात केली. गेली सहा महिन्यापासून बांधकाम बंद असल्याने पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला असे बांधकाम करणारे ठेकेदार, मिस्त्री व मजुरांचे म्हणणे आले. पावसाळ्यामुळे वाळू बंदी होते हे सर्व श्रुत आहे. परंतु पावसाळा संपला आणि हिवाळा सुरू असून नद्यांचे पाणी काही दिवसातच वाहने बंद होईल .मोठमोठ्या नद्यातील वाळू उघडी पडली आहे तरी देखील प्रशासन वाळू खुली करायला तयार नाही. वाळू संदर्भात मिस्त्री लोकांनी आंदोलन केले होते. याचीही अद्याप कोणी दखल घेतली नाही. नेमकं काय चाललंय हे समजायला तयार नाही. एक तर प्रशासनाने वाळू खुली करण्याची तारीख जाहीर करावी अन्यथा वाळूचे लिलाव होणार नाहीत हे स्पष्ट करावे असे मत या लोकांचे येऊ लागले असून इतर जिल्ह्यांमध्ये जिथे बांधकाम चालू आहे तेथे वाळूचे ढगारे दिसून येतात वाळू वाहतूक होताना दिसून येते मग बीड जिल्ह्यातच या साथी निर्बंध का असा सवाल करून शासन प्रशासन यांनी बीड जिल्ह्यातील नागरिकांना या संदर्भातून वेटेज धरण्याचा प्रकार चालवला असल्याचा स्पष्ट आरोप होऊ लागला आहे.

आमचे पुढारी गप्प का ?

जिल्ह्यातील एकूण एक प्रश्नावर लक्ष केंद्रित करणारे सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी मंत्री बदामराव पंडित, आ.प्रकाश दादा सोळुंके, आ. सौ. मुंदडा , आ. संदीप भैया क्षीरसागर,आ.धनंजय मुंडे एवढेच काय मंत्री पंकजाताई मुंडे नव्हे तर प्रत्येक प्रश्नाची दखल घेणारे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे वाळू संदर्भात ब्रश शब्द काढायला तयार नाहीत. जिल्ह्यामध्ये वाळूबंदीचा गंभीर प्रश्न असताना यांचे का तोंड उघडत नाहीत.अशी स्पष्ट विचारणा बांधकाम व्यवसाईका मधून होऊ लागली आहे.

जिल्ह्यात वाळूबंदी ; मग वाळू माफियांना कशी मिळते ?

बीड जिल्ह्यामध्ये वाळू उपसा आणि वाहतुकीला बंदी आहे तरी देखील वाळूमाफियाशी संपर्क केल्यास वाळू मिळते. पण सोन्याच्या भावाने खरेदी करावी लागते दोन ब्रास वाळूसाठी साडे पंधरा हजार रुपये मोजावे लागतात. पोलीस लोक वाळूच्या गाड्या पकडतात .मग नेमके वाळू सप्लाय करणारे यांना कशी काय भीती नाही ? असा सवाल केला जाऊ लागला आहे. याचा अर्थ येथून तेथून कोणाच्यातरी माध्यमातून शिजत असल्याचं देखील बोलल जाऊ लागलं आहे.

जिल्हाधिकारी व सीईओ यांनी केली मुलींच्या शासकीय वस्तीगृहाची पाहणी

अंबाजोगाईदि १२ (प्रतिनिधी) - येथील मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबाजोगाई येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (आयएएस) व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान (आयएएस) यांच्या पथकाकडून भेट देऊन पाहणी केली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेले मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबाजोगाई येथे नुकतेच दिनांक ७ जानेवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (आयएएस) व बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान (आयएएस) यांनी भेट दिली. सदर भेटीदरम्यान त्यांनी वसतिगृहाची परिपूर्ण तपासणी केली. यावेळी वसतिगृहामध्ये कशाप्रकारे कामकाज चालते, विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या भौतिक सुविधा पुरविण्यात येतात, याबाबत त्यांनी वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती समृद्धी भवरे यांच्याकडून माहिती घेतली. याप्रसंगी विद्यार्थिनी सोबत झालेल्या चर्चेतून विद्यार्थिनींसाठी लायब्ररीची निकड लक्षात घेऊन वसतिगृहात नेमकी कुठे व कशा प्रकारे सुसज्ज लायब्ररी तयार करता येईल यासंबंधी वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती भवरे यांच्या सोबत नियोजनात्मक चर्चा केली. या पथकाने वसतिगृहाच्या कामकाजाचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. त्यांनी वसतिगृहाचे गृहपाल श्रीमती समृद्धी भवरे, सर्व विद्यार्थीनी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

आदेश खटाणे यांच्या रक्तदानामुळे नऊ दिवसांच्या बाळाचे वाचले प्राण

युवा नेते स्वप्निल वरपे मित्र मंडळाची माणुसकी

बीड दि १२ (प्रतिनिधी)- शहरातील अपेक्स हॉस्पिटल येथे दाखल असलेल्या गायत्री पवार यांच्या अवघ्या नऊ दिवसांच्या चिमुकल्यासाठी ० निगेटिव्ह रक्तगटाची तातडीची गरज निर्माण झाली होती. मात्र सध्या बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तबॅग उपलब्ध होणे कठीण झाले होते.ही माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे यांनी तात्काळ आपल्या मित्रपरिवाराशी संपर्क साधून मदतीचे आवाहन केले. यावेळी त्यांचे सहकारी आदेश खटाणे यांनी क्षणाचाही विलंब न करता रक्तदान करण्याचा निर्णय घेतला आणि आपली रक्तबॅग सुपूर्द केली. त्यांच्या या तत्परतेमुळे नऊ दिवसांच्या बाळाचे प्राण वाचले.स्वप्निल वरपे व त्यांच्या मित्रपरिवाराची सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, संकटाच्या वेळी माणुसकीचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात सध्या रक्ताचा तीव्र तुटवडा जाणवत असल्याने युवकांनी व नागरिकांनी पुढे येऊन रक्तदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.या प्रसंगी ज्ञानेश्वर सपकाळ, शिवराज गायकवाड, विठ्ठल दळवे, अभि खांडे, अजय डोके, गणेश लांडगे, सचिन जंजाळ तसेच इतर तरुण उपस्थित होते.सामाजिक जबाबदारीतून केलेल्या या रक्तदानामुळे एका निष्पाप जीवाला नवे आयुष्य मिळाले आहे.

महावितरणचा मनमानी कारभार उघडा ; गेवराई शहर व ग्रामीण भागात नियमबाह्य व भेदभावपूर्ण वीजपुरवठा -उद्धव बापू मडके

गेवराई दि १२ (प्रतिनिधी)- गेवराई शहर व परिसरातील नागरिकांवर अन्याय करणारा महावितरणचा बेजबाबदार आणि मनमानी कारभार आता चव्हाट्यावर आला आहे.डिटिस क्रमांकानुसार फिडरवाईज वीजपुरवठा, तसेच शहर व ग्रामीण भागातील गावांना समान आणि नियमबद्ध वीजपुरवठा देण्याबाबत महावितरणकडून सर्रास दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेना तालुका प्रमुख उद्धव ज्ञानेश्वर मडके पाटील यांनी केला आहे.

महावितरणकडे याबाबत अधिकृत पत्रव्यवहार करूनही, आजतागायत स्पष्ट, लेखी व अंतिम माहिती देण्यात आलेली नाही, हे लोकशाही मूल्यांना धरून नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.गेवराई शहरातील अर्बन फीडरवर काही ठरावीक भागांना प्राधान्य देत तर काही गावांना व वस्तींना अकारण भारनियमन, कमी दाब आणि अनियमित वीजपुरवठा केला जात असल्याचे वास्तव समोर आले आहे.यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे.डिटिसी क्रमांकानुसार फिडरवाईज संपूर्ण माहिती देणे हे महावितरणचे कर्तव्य असताना,ती माहिती जाणीवपूर्वक टाळणे, उशीर लावणे आणि गोलमोल उत्तरे देणे,याचा अर्थ काहीतरी गडबड आहे, असा थेट संदेश जनतेत जात आहे. याबाबत उद्धव मडके पाटील यांनी महावितरण प्रशासनाला स्पष्ट अंतिम इशारा देत सांगितले की,तत्काळ फिडर वाईज संपूर्ण माहिती, नियमबद्ध व समान वीजपुरवठा सुरू न केल्यास,लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन, जनआक्रोश आणि वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल करण्यात येईल.जनतेच्या हक्कासाठी शिवसेना रस्त्यावर उतरणार महावितरणच्या निष्काळजीपणामुळे जर एकही नागरिक अंधारात राहिला,तर त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनाची असेल,असा ठाम इशाराही यावेळी देण्यात आला.

श्रीहरी महाराज,विवेक शास्त्री यांच्या शुभहस्ते श्री साई डिजिटल प्रिंटिंग व सीजनचा शुभारंभ

अंमळनेर दि १२(प्रतिनिधी)- श्रीसाई डिजिटल प्रिटिंग अँन्ड सिझन्स हाऊसचा शुभारंभ ह. भ. प. श्रीहरी महाराज पवार आणी ह. भ. प. विवेक म हाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते बीड येथील नगररोडवर संपन्न झाला. शिरुर कासार येथील विजय बन्सी गाडेकर यांनी आर. टी. ओ. कामकाजात यशस्वी काम केल्यानंतर या कामा बरोबरच आता प्रिंटिंग आणी सिझन्स हाऊस या व्यवसायात पदार्पण केले आहे. तसा गाडेकर यांना प्रिंटिंग व्यवसायात गेल्या तिन दशकांपासुन अनुभव असून अत्याधुनिक पध्दतीने होणार्या छपाई तंत्रज्ञानाचा वापर करीत नव्याने पदार्पण गाडे आहे. रविंद्र गाडेकर, संतोष गाडेकर यांची देखील साथ विजय गाडेकर यांना मिळत आहे. या प्रसंगी शिरुरचे प्रथम नगराध्यक्ष रोहीदास गाडेकर, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी बालाजी धनवे, अँड अजयजी राख, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, गटविकास अधिकारी अनिरुध्दसानप, विस्तार अधिकारी ऋषीकेष शेळके, बाळासाहेब पिंगळे, अँड. रोहीदास येवले अध्यक्ष वकील संघ, मधुकर भांडेकर, दत्तात्रय गाडेकर, रामेश्वर शेळके, समर्थ पवळ, कुबोटा, मधुकर शेळके, दिलीप मिसाळ, बालाजी पवार, अशोक मिसाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेत माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

बीड दि १२(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील तांदळवाडी घाट येथील तांदळेश्वर विद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष डाके सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जि प शाळेचे मुख्याध्यापक क्षीरसागर सर हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक लहाने सर यांनी केले कार्यक्रमाचे संचलन वामने सर यांनी केले. यावेळी अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपले विचार या दोन महान व्यक्ती बद्दल व्यक्त केलेअध्यक्षीय समारोह मध्ये डाके सर यांनी स्वामी विवेकानंदांचा जीवन परिचय व जिजाऊंच्या कर्तृत्वाचे वर्णन केले. जिजाऊ चे लेकींनी जिजाऊची वेशभूषा केली होती.या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यालयांमध्ये हस्तक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे आभार शिवाजी पवार सर यांनी मानले .

डॉ.वासुदेव नेहरकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

केज दि १२ (प्रतिनिधी)-केज तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान म्हणून ओळखले जाणारे डॉ. वासुदेव नेहरकर यांचा वाढदिवस शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी खेड्यापाड्यात पक्ष संघटना पोहोचवली. कै. संजय पाटील, बाळासाहेब बोराडे, भगवान केदार आणि सुरेंद्र तपसे या सारख्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी संघर्षाच्या काळात भाजप ला केज तालुक्यात जिवंत ठेवण्याचे ऐतिहासिक काम केले आहे. पदांपेक्षा निष्ठा हीच मोठी संपत्ती डॉ. नेहरकर यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्त्वपूर्ण पदे भूषवली आहेत.

भगवान विद्यालयात माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बीड दि १२(प्रतिनिधी)- शहरातील धानोरा रोडवरील भगवान विद्यालयामध्ये स्वराज्य जननी राजमाता राष्ट्रमाता मा जिजाऊ साहेब यांची जयंती व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर, उपमुख्याध्यापक गर्जे सर ,पर्यवेक्षक ढोकर सर, डोळे सर ठोसर सर व जिजाऊंच्या वेशभूषेतील विद्यार्थिनींच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती चोले मॅडम यांनी केले. महाराष्ट्र कला संचालनालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या एलिमेंट्री व इंटरमिजिएट चित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव याप्रसंगी करण्यात आला. जिजाऊच्या लेकींनी स्वगतातून जिजाऊचे कार्य विशद केले.स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा गौरव विद्यार्थ्यांनी मनोगतातून व्यक्त केला. नाट्य छटेतून जिजाऊंचा कणखरपणा विद्यार्थिनींनी सादर केला. श्रीमती बाबर मॅडम यांनी विवेकानंदांचे जीवन कार्य तर श्रीमती पवार मॅडम यांनी जिजाऊंचे कार्य काव्यातून व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपातून मुख्याध्यापक आघाव सर यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मोरे मॅडम यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमती वंदना सानप मॅडम यांनी मानले.

किशोरी इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह त्यांच्यातील कला गुण जोपासते-डॉ.अदिती सारडा

बीड दि १२ (प्रतिनिधी)- बीड येथील किशोरी इंग्लिश स्कूलच्या तिसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा सांस्कृतिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास मॅडम यांनी विद्यार्थांचे कौतूक केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. अदिती सारडा यांनी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी व न्याय देण्याची भूमिका किशोरी इंग्लिश स्कूल सातत्याने जपत असल्याचे स्पष्ट केले.

शहरातील नामांकीत प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट संचलित किशोरी इंग्लिश स्कूल शाळेचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडले. शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून, शिस्तबद्ध नियोजन व दर्जेदार सादरीकरणामुळे उपस्थित मान्यवर व पालक प्रभावित झाले. प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरणातून करत स्वत:चा आत्मविश्वास वाढला या स्नेहसंमेलनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य एज्युकेशन ग्रुप व प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका डॉ. अदिती सारडा या होत्या. यावेळी नामांकित चार्टर्ड अकाउंटंट गिरीषजी गिल्डा, प्रशासकीय अधिकारी संतोष लहाणे, राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डी. ओ. तायडे

आणि किशोरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या एम. आर. बिरला यांची उपस्थिती होती. या स्नेहसंमेलनात प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून किशोरी इंग्लिश स्कूलच्या शिक्षण पद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. शाळेतील शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे हे स्नेहसंमेलन यशस्वी ठरले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार आणि कला जोपासणारी शाळा म्हणून किशोरी इंग्लिश स्कूलने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनूर चे जिल्हास्तरीय दिव्यांग मूला मुलींच्या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

बीड दि.१२ प्रतिनिधी-जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड , जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड व सौ. सुमतीबाई गुणाले शिक्षण प्रसारक मंडळ,धानोरा, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. ०७ जानेवारी ते ०९ जानेवारी २०२५ अंबाजोगाई येथे दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय मुला मुलींच्या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत परिवर्तन सेवाभावी संस्था संचलित अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनुर, शाळेने एकूण २१ पारितोषिक मिळवत जिल्ह्याचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या स्पर्धेमध्ये विविध प्रकारच्या दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या अनुक्रमे प्रथम , द्वितीय, आणि तृतीय असे एकूण २१ पदकांची कामगिरी केली. यामध्ये सॉफ्ट बॉल थ्रो , व्हील चेअर रेस , गोळा फेक एक कुबडी धावणे व धावणे या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःचे मनोबल वाढवत अथक प्रयत्नातून या स्पर्धेमध्ये घवघवित यश संपादन केले. प्रथम पारितोषिक - कु.माधवी राठोड,पूनम रुपनर,योगिता खटाने, प्रतीक्षा मुंडे, रूपाली जाधव , शिवानी चव्हाण चि. विशाल राठोड , सुरज काळे , पदमराज रोकडे, द्वितीय पारितोषिक -चि.कार्तिक मुळे,प्राची पवार, माधवी राठोड चि. राहुल राठोड , उमेश राठोड , तृतीय पारितोषिक - चि. इजेश्वर साबळे. सन्माननीय जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील व वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. अंकुशरावजी नखाते ,आयोजक दिनकररावजी गुणाले मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गुणगौरव केला व राज्यस्तरीय स्पर्धेत विविध स्पर्धेत यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी शाळेच्या क्रीडा शिक्षिका श्रीमती गर्जे एम.डी. यांचे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तसेच या स्पर्धेमध्ये श्री खडके व्ही. एस. कानडे के. एन. श्रीमती बुराणे एस. जी.यांनी परिश्रम घेतले.

परिवर्तन सेवाभावी संस्था, नेकनूर संस्था अध्यक्ष तसेच आमचे मार्गदर्शक बाळकृष्णजी खारके व सचिव मा.श्री नंदकिशोर कांकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक सन्माननीय भोंडवे एस.वाय. यांनी दिव्यांग मुला मुलींचे कौतुक व अभिनंदन केले.

श्रीराम कथेमुळे मानवी जीवनातील आदर्श जीवनमूल्य नितिमत्ता, संस्कृतीचे दर्शन घडते-महंत मंदार महाराज

आष्टी दि १२ (प्रतिनिधी) -श्रीराम कथेचे महत्त्व हे मानवी जीवनातील आदर्श जीवनमूल्ये नीतिमत्ता आणि संस्कृतीचे मार्गदर्शन आहे. राम कथेद्वारे आपल्याला कर्तव्य,त्याग सत्य आणि धर्माचे पालन कसे करावे याची शिकवण मिळते. असे प्रतिपादन दादेगाव येथील देवदास स्वामी मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी केले.

आष्टी येथे आमदार सुरेश धस यांचे वतीने आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते यावेळी आमदार सुरेश धस आणि तालुक्यातील संत प्रवचनकार कीर्तनकार उपस्थित होते ते पुढे म्हणाले की, राम कथाही वैवाहिक जीवनातील आदर्श संबंधांपासून ते समाजातील समस्यांवर मात करण्याची प्रेरणा देते त्यातून मानसिक शांती आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते तसेच रामकथा ही सत्य धर्म आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याचे मात्र शिकवते कसोटीच्या प्रसंगी ही जीवनमूल्य कशी जपायची हे त्यातून कळते राम कथा ही भारतीय संस्कृतीचा आणि साहित्याचा अविभाज्य भाग आहे. असे त्यांनी शेवटी प्रतिपादन केले. या श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यामध्ये उपस्थित प्रवचनकार,कीर्तनकार या संतांचे पूजन करण्यात आले विशेष म्हणजे पहिल्या दिवशी या संत पूजनाचा मान आष्टी तालुक्यातील पत्रकारांना देण्यात आला. त्यांचे वतीने ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे,ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज,ह.भ.प.दिनकर तांदळे महाराज,

ह.भ.प.रामदास डोरले नाना,ह.भ.प.नवनाथ महाराज पोकळे,ह.भ.प.हौसराव महाराज आजबे,ह.भ.प. कारंडे महाराज,ह.भ.प. बाळासाहेब महाराज झगडे,ह.भ.प. रवी महाराज तवले, ह.भ.प.नानासाहेब महाराज भोगाडे,ह.भ.प. शेंबडे महाराज पांढरी,ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे,ह.भ.प.गोविंद महाराज पवार,ह.भ.प. महेश महाराज बळे,ह.भ.प.जाधव महाराज दादेगावकर ह.भ.प. धस महाराज जामगावकर या संतांचे पूजन करण्यात आले.यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, पत्रकार दत्ताभाऊ काकडे, पत्रकार प्रवीण पोकळे, पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे, पत्रकार राजेंद्र लाड आदी उपस्थित होते..

पंचायत समिती कार्यालयासमोर, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यानिमित्त आज भव्य शोभायात्रा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. शोभायात्रेत भगवे ध्वज, टाळ-मृदुंगाच्या गजरात श्रीराम नामस्मरण, भजन-कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. दरम्यान या पावन श्रीराम कथा सोहळ्याचा सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.यावेळी कोमल थेटे यांनी रामलल्लाची प्रतिकृती असलेली आकर्षण रांगोळी साकारून सर्वांचे लक्ष वेधले.

बीड शहरासह सर्वत्र माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बीड दि १२(प्रतिनिधी)– बीड सह सर्वत्र राजमाता मा जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीच्या कार्यक्रमातून काही शाळांनी विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा देखील घेतल्या. तर संस्था चालकांना निमंत्रित करून शाळा व्यवस्थापनाने मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन केले जिल्ह्यात सर्वत्र शाळा महाविद्यालयात या जयंतीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला असल्याची माहिती ठीकठिकाणांच्या वार्ताहर आणि कळवली.

गणेशनगर शाळेत राजमाता जिजाऊ आणि विवेकानंद यांना अभिवादन

बीड – बीड तालुक्यातील लिंबागणेश केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशनगर येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश भट तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच ज्योतीराम वायभट, सौ मालन वायभट आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे सहशिक्षक संतोष हावळे यांनी केले.यावेळी जिजाऊ वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी वायभट हिने तर सर्वांचे आभार शिवानी वायभट हिने मानले.

उकड पिंपरी येथील विश्व विद्या मंदिरात युवा दिन उत्साहात साजरा

बीड –गेवराई तालुक्यातील उकड पिंपरी येथील विश्व विद्या मंदिर, येथे स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विश्व स्कूल क्रीडा महोत्सव २०२६ चे उद्घाटन करण्यात आले.
यावेळी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ.भारती करपे यांनी विवेकानंदांचे रामकृष्ण मिशन याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले.हरी कुंडरे सरांनी स्वामी विवेकानंदांना भारतीय युवकांनकडून असलेल्या अपेक्षा व महत्त्वाकांक्षा सांगितल्या.यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांचे जीवन शौर्य,मातृत्व आणि कर्तव्याची प्रेरणा व ज्यांनी एका सामर्थ्यशाली राजाचा उदय घडवून मध्ययुगीन भारताला नवी दिशा दिली या बद्दल शितल शेळके मॅडम यांनी सांगितले.

कुर्ला येथे जिजाऊ व विवेकानंद जयंती साजरी

बीड– बीड तालुक्यातील यशवंत विद्यालय कुर्ला येथे राजमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अभिषेक राऊत प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक जामकर सर उपस्थित होते मुख्याध्यापक राऊत यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांनी विवेकानंदांचे विचार आत्मसात करून आपले जीवन गतिमान करावे असे सागितले. कार्यक्रमांचे प्रास्तविक तुपे सर यांनी केले यावेळी विद्यार्थिनी जिजमातेच्या वेशभूषेत आलेल्या होत्या त्याच्या सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्याची भाषणे झाली.

अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

वडवणी –तालुक्यातील चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती सोमवार दि.१२ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सावंत सर व प्रमुख पाहुणे काळे सर व पटाईत सर होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीस अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या प्रसंगी जिजाऊ वंदना श्रीमती सावंत मॅडम यांनी म्हटली यावेळी शाळेतील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी जिजाऊंची वेशभूषा केली होती कार्यक्रमात प्रमुख व त्यांनी मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आवारे सरांनी केले व आभार व्यक्त बडे सरांनी केले.

मातृशक्ती व विवेक बुद्धीचा जागर राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद–मुरलीधर पवार

गेवराई :येथील शारदा विद्या मंदिर गेवराई येथे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार, यांनी बोलताना वरील उद्गार काढले.यावेळी माजी प्राचार्य राजेंद्र जगदाळे, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र लुंगारे, ज्ञानेश्वर चव्हाण, सुरेश तळतकर, दादाराव काकडे, हेमंत क्षीरसागर, श्रीमती संगीता पवार यांच्या प्रमुख उपस्थितीतांनी राजमाता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन केले इ आठवीच्या विद्यार्थिनी कु माधवी काळे, शालवी जवकर या विद्यार्थिनींनी जिजाऊ वंदना प्रस्तुत केली, तदनंतर राक्षसभुवन विद्यालयातील विद्यार्थिनी कु ऋतुजा पट्टे, कु आर्या चौथाईवाले, कु फरीन काझी, तथा शारदा विद्या मंदिर येथील विद्यार्थिनी कु सृष्टी मदूरे, गोपिका ढोबळे, सानिया शेख यांनी राजमाता जिजाऊ तथा स्वामी विवेकानंद यांच्या आदर्शवादी तथा प्रेरणादायी विचारावर बहारदार व्याख्यानरुपी आपले विचार व्यक्त केले .तर यावेळी इतर मान्यवरांनी देखील मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची ओळख करून दिली सू त्रसंचालन कु समृद्धी रामेश्वर तौर, चि अथर्व सदाशिव लाड तर उपस्थितांचे आभार चि आदर्श केशव चव्हाण या विद्यार्थ्यांनी मानले.

डॉ.आंबेडकर विद्यालयामध्ये जयंती साजरी

बीड – बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयां मध्ये स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादना चा कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयां मध्ये स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादना चा कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरातून काढण्यात आली. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक व्ही एस देशमुख, एस बी मेश्राम, यु.बी. पवळ, आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन पवळ यु. बी. प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले.

राजमाता जिजाऊंचे संस्कार व स्वामी विवेकानंदाचे विचार आत्मसात करा–प्रा. डॉ.योगिता होके पाटील

बीड – राजमाता जिजाऊ यांचे संस्कार आणि स्वामी विवेकानंदाचे विचार आत्मसात करावेत व त्या दृष्टीने चालावे असे आवाहन योगिता होके पाटील यांनी केले. सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि अखिल भारतीय विद्यार्थी परीषद शाखा बीड यांच्या वतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती निमित्त आयोजित जिजाऊंच्या संस्कारातून घडलेले शिवराय आणि आजचा युवक या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या सदस्य डॉ. सारिकाताई क्षीरसागर होत्या. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना त्या म्हणाल्या की, संघर्षाचा काळ हा आवडीचा असतो. संघर्षातूनच माणसाचा विकास होतो. राष्ट्रवाद, देशभक्ती सांगण्यासाठी चांगले विचार महत्वाचे असतात. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार युवकांपर्यंत पोहचले पाहिजेत व युवकांची जडणघडण राष्ट्रभक्ती देशभक्ती वाढली पाहिजे तसेच युवकांना स्वतःची जवाबदारी ओळखता आली पाहिजे. बोलण्यापेक्षा कृती करणे जवाबदारीचे जाणिव ठेवणे महत्वाचे आहे असे विचार त्यांनी व्यक्त केले. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन डॉ. सारंग जोशी यांनी केले सुत्रसंचालन कु. गितांजली शेळके यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय व आभार कु. क्षितीजा धांडे यांनी व्यक्त केले.

गणेशनगर शाळेत राजमाता जिजाऊ आणि विवेकानंद यांना अभिवादन

बीड –तालुक्यातील लिंबागणेश केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशनगर येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश भट तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच ज्योतीराम वायभट, सौ मालन वायभट आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे सहशिक्षक संतोष हावळे यांनी केले.यावेळी जिजाऊ वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी वायभट हिने तर सर्वांचे आभार शिवानी वायभट हिने मानले.

बंकटस्वामी कॉलेजमध्ये जयंती साजरी

बीड – येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.ब्रह्मनाथ मेंगडे यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी ढेरे व वैष्णवी घोरपडे यांनी सादर केलेल्या सुमधुर जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली.याप्रसंगी डॉ.नीता बावणे व प्राध्यापिका छाया सोंडगे यांनी आपले प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ.नीता बावणे प्राध्यापिका छाया सोंडगे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.मनोजकुमार नवसे यांनी केले तर कनिष्ठ विभागाचे NSS कार्यक्रमाधिकारी प्रा.रणजीत आखाडे यांनी आभार प्रदर्शन केले.

एमआयआयटी महाविद्यालयात जयंती साजरी

बीड –एम आय आय टी महाविद्यालयामध्ये स्वामी विवेकानंद जयंती आणि राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंती प्राचार्य जो जो सर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन अंकिता जरांगे हिने केले. या कार्यक्रमानिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यास विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी उपप्राचार्य शेख साबेर तसेच प्रा संजीवनी पवार,प्रा मयुरेश गावरस्कर, मुकेश ससाणे, सुनीता सदाफुले व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात जयंतीनिमित्त व्याख्यान संपन्न

नेकनूर –बीड तालुक्यातील नेकनूर येथील पाटील कला व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मातकर व्ही.बी.हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. मातकर व्ही .बी.यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांनी या दोन्हीही महान व्यक्तींचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले प्रा. रामरुले डी.के.यांनी याप्रसंगी आपले विचार मांडले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मुजावर एस . टी. यांनी केले , प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. कलाने के. के. यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले.

श्री नारायण मा.व उ.मा.विद्यालयामध्ये मॉ जिजाऊ व स्वामीजींना अभिवादन

बीड – तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये राजमाता जिजाऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.
प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, इनकर बी. जे., प्राध्यापक पौळ डी. बी., श्रीमती बबीता भुतावळे मॅडम होते .विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ साहेब यांची वेशभूषा करून आले होते. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी एका पेक्षा एक असे उस्फूर्त भाषणे केली. भाषण स्पर्धेत विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक अशोक घरत यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रिया बुधनर व सावंत ऋतुजा यांनी केले तर आभार प्रदर्शन भुतावळे मॅडम यांनी मानले.

वसंतदादा पाटील महाविद्यालयात राजमाता व स्वामींना अभिवादन

पाटोदा– नवगण शिक्षण संस्थेचे वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या व महिला तक्रार निवारण समितीच्या राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले या कार्यक्रमास प्रो.डॉ.प्रकाश कोन्का, उप–प्राचार्य डॉ.सतीश माउलगे, उप–प्राचार्य डॉ.अभय क्षीरसागर, क.वि.उप–प्राचार्य प्रा.नामदेव चांगण,पर्यवेक्षक प्रा.अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक अशोक पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सोमनाथ लांडगे, डॉ.मनिषा गाडवे यांच्या सह महाविद्यालया तील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व सुत्र संचालन डॉ. प्रज्ञा महेशमाळकर यांनी केले तर आभार डॉ.पवनकुमार चांडक यांनी मानले.

कै.बि.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बीड दि.१२ जानेवारी – राजस्थानी सेवा समाज संचलित कै. बि. दे. राठी राजस्थानी प्रा. विद्यालय सहयोग नगर या शाळेत १२ जानेवारी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती अतिशय उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक महेश पारीख सर, तसेच गीता परिवारच्या सदस्या सौ. हेमा बाहेती सौ. भारती जाजू व सर्व कर्मचारी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक महेश पारीख सर व ज्येष्ठ शिक्षिका धारूरकर मॅडम या होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डावकर सर यांनी जिजामाता यांच्या जीवन कार्याचा संपूर्ण आलेख विद्यार्थ्यांसमोर मांडला तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. भारती भाभी जाजू यांनी स्वामी विवेकानंद यांची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यापाठोपाठ त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटप केली. अध्यक्षीय समारोपात धारूरकर मॅडम यांनी जिजामाता आणि स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. यावेळी १० विद्यार्थ्यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलकर्णी मॅडम यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सिकची सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विभाग प्रमुख सिकची सर, एकशिंगे सर, पंडित सर, राडीकर मॅडम, सारडा मॅडम, जोशी मॅडम, रमेश शिंदे, उमेश कोठी, गीता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

विनायक माध्य.व उच्च माध्य.विद्यालयात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

बीड दि १२(प्रतिनिधी):–विनायक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रमाता ,राजमाता व जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक तथा प्राचार्य रियाज बेग सर हे होते. तर प्रमुख म्हणून शाळेचे उपमुख्याध्यापक माणिक अनुसे, शाळेचे पर्यवेक्षक अमरापुरकर सर ,हिंदी विषयाचे शिक्षक शिंदे सर ,इंग्रजी विषयाचे शिक्षक राऊत सर, विज्ञान विषयाचे शिक्षक तकिक सर हे होते.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख यांच्या हस्ते राजमाता ,राष्ट्रमाता ,जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून

अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती हंडीबाग मॅडम* यांनी केले. तसेच शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी राष्ट्रमाता, जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी सविस्तर माहिती सांगितली. शाळेतील शिक्षिका शिंदे मॅडम. भालेराव मॅडम व मुंडे मॅडम यांनी राजमाता, राष्ट्रमाता व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी सखोल माहिती सांगितली कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य रियाज बेग सर यांनी अध्यक्षीय समारोपामध्ये राष्ट्रमाता, राजमाता, जिजामाता ,स्वामी विवेकानंद यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील *संस्कृत विषयाचे शिक्षक उनबेग सर यांनी केले. तर आभार काशिद आर एस यांनी मानले .कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

बीड – लोकमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील त्यांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना माजी नगरसेवक अॅड. विकास जोगदंड, माजी नगरसेवक बिभीषण लांडगे, अॅड मिलिंद वाघमारे, साहिल गायकवाड आदर्शराजे जोगदंड सह आदी

पाटोदा व पारगाव घुमरा येथे जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

पाटोदा – पाटोदा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सार्वजनिक राजमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्साह वातावरण साजरी करण्यात आली.यावेळी राजमाता जिजाऊ च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी सर्व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच तालुक्यातील पारगाव घु. येथे राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांचा जन्मोत्सव पारगाव ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयामध्ये अखिल भारतीय वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष ह. भ. प. प्रकाश बोधले महाराज व त्यांचे उत्तर अधिकारी ह.भ. प. परमेश्वर महाराज यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून साजरा करण्यात आला. प्रकाश महाराजांनी जयंतीनिमित्त खूप मोलाचे मार्गदर्शन करून राजमाता जिजाऊ यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केल यावेळी पारगाव गावातील सरपंच,ग्रामपंचायत सदस्य,माजी सरपंच सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होतो

राष्ट्रमाता जिजाऊंचा व स्वामी विवेकानंदांचा जन्मोत्सव गोरक्षनाथ विद्यालयात रंगला

बीड – तालुक्यातील ढेकणमोहा या ठिकाणी राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंदांची जयंती राजमाता जिजाऊ आणि विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर आयोजित वक्तृत्व स्पर्धा घेऊन उत्साहात साजरी करण्यात आली. गोरक्षनाथ विद्यालयांमध्ये सामाजिक कार्यकर्ते हरी भाऊ खाडे, भारत दादा देवकते, पत्रकार अनिल घोरड यांच्या नियोजनात जिजाऊ जयंतीचा कार्यक्रम पार पडला यावेळी सर्व राजकीय सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते उपस्थित आणि जिजाऊंच्या विचाराला उजाळा देत जिजाऊ चे विचार हे माणूस घडविण्यासाठी आहेत असेच गौरवोद्गार याप्रसंगी काढले या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.सोमनाथराव बडे हे होते.यावेळी अरुण नाना डाके, चंद्रकांत फड, भाऊसाहेब डावकर, भाऊनाना सुरवसे, सुधीर बापू काकडे, बप्पासाहेब डावकर, संतोष दादा घुमरे, सरपंच शिवाजी गाडीवान, अंनत करांडे, प्रभू सिंग ठाकूर, प्रलाद मुंडे, भारत होंडरे,हरिभाऊ शेळके, पंजाब काकडे, रवीदादा गंगावणे, नारायण देवकते, नागेश शिंदे, रामा भाऊ भोगे,पंजाब जीवन डाके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते हरीश खाडे आणि भारत देवकते यांनी उद्देश डोळ्यासमोर ठेवून पत्रकार अनिल गोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए. वाय मुंडे सर यांनी केले मुख्याध्यापक धनराज मुंडे यांनी देखील विद्यार्थ्यांना जिजाऊंचे विचार सांगितले उपस्थित यांचा आभार प्रदर्शन करत उप मुख्याध्यापक बोराडे सरांनी जिजाऊंच्या विचारावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला.

गेवराई येथील संपादक व पत्रकार ग्रुपने केले सहारा अनाथालयातील मुलांना ब्लँकेट वाटप

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी) – मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गेवराई येथील संपादक व पत्रकार ग्रुपच्या वतीने दर्पण दिनानिमित्त ग्रुपने सहारा अनाथालयातील मुला-मुलींना भर कडाक्याच्या थंडीत ब्लँकेटचे वाटप करून मायेची उब दिली आहे. अशाप्रकारे आदर्श उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या संपादक व पत्रकार ग्रुपचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे असे मत पत्रकार मित्र तथा नगरसेवक दादासाहेब घोडके यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार मित्र तथा नगरसेवक दादासाहेब घोडके तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब घोडके व सहारा अनाथालयाचे संचालक संतोष गर्जे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांनी तर सूत्रसंचालन साप्ताहिक बीड राज्यकर्ताचे संपादक अमोल वैद्य यांनी व आभारप्रदर्शन पत्रकार प्रदीप जोशी यांनी केले. प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर संपादक शिवाजी मामा ढाकणे यांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी सहारा आनाथालयातील १०० मुलांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास संपादक व पत्रकार ग्रुपचे काझी अमान, अमोल वैद्य, प्रदीप जोशी, शिवाजी मामा ढाकणे, सिद्धांत मोरे, दत्तात्रय लाड, बप्पासाहेब पिंपळे, सय्यद कौसर, नितीन वाकडे, वाल्मीक कदम, सुमेध करडे, खय्युम बागवान यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त

माजलगावात भव्य शिवकालीन शस्त्रप्रदर्शन

माजलगाव (प्रतिनिधी) : येथील माजलगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट आ.प्रकाशदादा सुंदरराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव नगरीत प्रथमच भव्य स्वरूपात शिवकालीन ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, युद्धशस्त्रांचे दर्शन तसेच मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि तरुण पिढीला शौर्य, शिस्त व संस्कारांची प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा वाल्मिकी अर्बन कोऑप्रेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिल नखाते उपस्थित राहणार आहेत.

सविस्तर वृत्त असे की, हा कार्यक्रम तुळजाभवानी मर्दानी खेळ, प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला असून शिवश्री रविंद्र भाऊसाहेब जगदाळे (इतिहास संशोधक व शस्त्र-अभ्यासक) यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन दुर्मिळ शस्त्रसंग्रहाचे सादरीकरण होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वात भव्य अशा ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे दर्शन नागरिकांना घेता येणार आहे. तलवारी, भाले, कट्यारी, ढाली, तोफगोळे, जुनी युद्धसामग्री यासह प्रत्यक्ष युद्ध कौशल्यांचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. कार्यक्रम दि. १३ व १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या भव्य उपक्रमासोबतच आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक संदेश देणारा उपक्रमही राबविण्यात येत आहे यामुळे अनावश्यक खर्च टळून तोच निधी समाजोपयोगी कार्यासाठी उपयोगात येणार आहे. या उपक्रमात वही, पुस्तके, पेन, रंगसाहित्य, दप्तर, पाण्याच्या बाटल्या तसेच औषध पेट्या, बँडेज, सॅनिटायझर, थर्मामीटर आदी साहित्य स्वीकारण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव, लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, माजलगाव, जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग व फिजिओथेरपी, सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, माजलगाव मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, कणिफनाथ माध्यमिक विद्यालय मोहखेड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. हा उपक्रम शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राष्ट्रभक्तीची भावना जागवणारा ठरणार असून विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात अ दर्जा प्राप्त

माजलगाव (प्रतिनिधी) : भाशिप्र संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाने नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये झालेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात दर्जा प्राप्त केला आहे.

सदर अंकेक्षण प्रक्रियेत अध्ययन अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम रचना, संशोधन कार्य, भौतिक सुविधा, डिजिटल साधनांचा वापर, विद्यार्थी कल्याण योजना, प्रशासकीय पारदर्शकता व गुणवत्ता हमी यासारख्या विविध घटकांचे सखोल मूल्यमापन करण्यात आले. महाविद्यालयाच्या या यशामागे दूरदृष्टी असलेले नेतृत्व अनुभवी व समर्पित प्राध्यापक वर्ग शिस्तबद्ध प्रशासन आणि सातत्याने प्रयत्नशील असलेले विद्यार्थी यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब कौशल्य आधारित शिक्षणावर दिला जाणारा भर तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम यामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा सातत्याने उंचावत गेला आहे. या यशाबद्दल संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासणी, विश्वास जोशी, अभय कोकड, एकनाथ जाधव यांनी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी व सर्व अंतर्गत गुणवत्ता अनेक सहभागातील सहकारी शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी या सर्वांचे कौतुक केले आहे.

वडवणी तालुक्यातील माजी सैनिकांनी आ.प्रकाश सोळंके यांची घेतली भेट

वडवणीतही माजी सैनिक भवन उभारण्याची मागणी

वडवणी,दि.११(प्रतिनिधी):- वडवणी तालुका माजी सैनिक संघटनेच्या शिष्टमंडळाने दि.१० जानेवारी २०२५ शनिवार रोजी माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत माजी सैनिकांच्या संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा झाली.

माजलगांव व धारुरच्या धर्तीवर वडवणी शहरात देखील माजी सैनिक भवनासाठी जागा उपलब्ध करुन देवून तसेच भवनाच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी माजी सैनिक संघटनेच्या वतीने करण्यात आली. याला आमदार प्रकाशदादा सोळंके यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत देशासाठी सेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा सन्मान म्हणजेच राष्ट्राचा सन्मान या उदात्त भावातून वडवणी शहरातही माजी सैनिक भावनासाठी जागा उपलब्ध करुन त्या ठिकाणी माजी सैनिक भवन लवकरच उभारण्यात येईल असा शब्द दिला. ही माजी सैनिकांसाठी अभिमानाची बाब आहे असे म्हणत सर्व माजी सैनिकांनी आ.प्रकाशदादा सोळंके यांचे आभार मानले. याप्रसंगी वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, माजी सैनिक संघटनेचे वडवणी तालुकाध्यक्ष माजी सैनिक शिवप्रसाद माळवदे, उपाध्यक्ष माजी सैनिक नंदकुमार मस्के, सचिव माजी सैनिक विश्वनाथ बडे, सदस्य माजी सुभेदार निळकंठ होंडे, माजी सुभेदार विठ्ठल गिलबिले, माजी सैनिक गोपीनाथ बडे, माजी सैनिक रघुनाथ नागरगोजे, माजी सैनिक अनिरुध्द कोठुळे, माजी सैनिक नारायण गदळे, माजी सैनिक अनंत मस्के, माजी सैनिक भगवान मस्के, माजी सैनिक राजेंद्र डोंगरे, माजी सैनिक कैलास शेंडगे, माजी सैनिक मारुती कराड, माजी सैनिक विश्वनाथ शिंदे, माजी सैनिक रामेश्वर पाटोळे व वीर माता, वीर पत्नी, माजी सैनिकांच्या पत्नी उपस्थित होत्या.

सेवानिवृत्त सुभेदार अशोक आरसूळ यांची मुंबईत पोलीस दलात शिपाई म्हणून निवड

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी) : बीड जिल्ह्यातील बेनसुर येथील सेवानिवृत्त सुभेदार अशोक माणिकराव आरसुळ यांनी २८ वर्षे भारतीय सैन्य दलात देशातील विविध राज्यात सेवा दिली. दि.३१ जुलै २०२२ रोजी ते सेवानिवृत्त झालेले असून देश सेवेनंतर ते आता महाराष्ट्र पोलीस दलात सेवा देणार आहेत. नुकत्याच झालेल्या पोलिस भरतीत त्यांची पोलिस शिपाई म्हणून निवड झाली असून दौंडच्या नानवीज पोलिस प्रशिक्षण केंद्रात त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. ते मुंबई शहर येथील पोलिस ठाण्यात रूजू झाले आहेत. या निवडीबद्दल त्यांचा बीड येथील त्यांच्या निवासस्थानी नातेवाईकांकडून सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी हाजीपूर जि.प.शाळेचे शिक्षक विनोद उगले, सौ.ललिता अशोक आरसूळ, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष तथा पत्रकार विनोद पौळ, ज्येष्ठ पत्रकार विनायक उबाळे, वैभव आरसूळ आदीजण उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या पोलिस भरती प्रक्रियेत शारिरीक चाचणी व लेखी परिक्षेत त्यांनी यश मिळवले असून त्यांची दि.२१ जुलै २०२५ रोजी निवड झालेली आहे. नानवीज येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात त्यांनी नुकतेच प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यांना मुंबई शहर येथील नागपाडा पोलिस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणून नियुक्ती मिळाली आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचा मित्र परिवारासह नातेवाईकांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

सफदर अली देशमुख राष्ट्रीय विद्यालय पेंडगाव येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

पेंडगांव (प्रतिनिधी) : स.अ.दे राष्ट्रीय विद्यालय पेंडगाव येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मु. अ श्रीमती येवले ए.बी व प्रमुख पाहुणे श्री.कोकाटे एस.डी.अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी प्रतिमेचे पूजन केले. जिजाऊ वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.त्यानंतर वर्ग ८ व १० वी मधून कु.डोळस सिद्धी व गोळे वैशाली या विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा केली होती. त्यानंतर वर्ग ८ वी मधून कु.डोळस सिद्धी,गाडे अनुष्का,पवार अंकिता, चि.डोळस रुद्र,काळकुटे भावेश तर वर्ग ९ वी मधून जाधव माया,डोळस गोरक्षी,कुटे अनिकेत, बहिर संभाजी,धट सिद्धी यांनी तर इयत्ता १० वी मधून पेंढारे समर्थ,शेख अदिबा,डोळस सिद्धी,धट गायत्री यांनी स्वामी विवेकानंद व मां साहेब जिजाऊ यांच्या व्यक्ती चरित्रावर सुंदर भाषणे केली. त्यानंतर शाळेतील शिक्षक श्री चादर सर,श्री धारकर सर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री कोकाटे सर व कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती येवले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मा साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.डरपे रोहिणी तर आभार प्रदर्शन परदेशी नंदिनी हिने केले. यावेळी शाळेतील गाडे सर, जवळेकर मामा व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'नॅक' च्या सुधारित मार्गदर्शक तत्वांमध्ये डिजिटलायझेशन महत्वाचे – पृथ्वीराज पंडित

गेवराई दि.१२ (प्रतिनिधी) :'नॅक' ही देशातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करणारी स्वायत्त संस्था आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार 'नॅक' ने मागील ३० वर्षातील सर्वात मोठे बदल केले आहेत. या बदललेल्या मूल्यांकन प्रक्रियेत डिजिटलायझेशन महत्त्वाचे आहे असे मत प्रीथ्वीराज पंडित यांनी व्यक्त केले.

महिला महाविद्यालयात 'नॅक' च्या सुधारित मार्गदर्शक तत्वांवर आयोजित कार्यशाळेत उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रोफेसर एन.एस.धर्माधिकारी व अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे हे उपस्थित होते. देशभरातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करणारी 'नॅक' आपल्या मूल्यांकन प्रक्रियेत महत्वपूर्ण बदल करत आहे. त्यादृष्टीने जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्ष द्वारा 'नॅक' च्या सुधारित मार्गदर्शक तत्वांवर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्रीथ्वीराज जयसिंग पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेच्या प्रथम सत्राचे प्रास्ताविक आयक्यूएसीचे प्रमुख प्रा.डॉ. संदीपान किवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.संगीता आहेर यांनी तर प्रा. डॉ.संजय भेदेकर यांनी आभार मानले. द्वितय सत्राचे सूत्र संचालन प्रा.डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले. प्रा.डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी आभार मानले.

लोकनेते सोळंके साखर कारखान्यात

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

तेलगाव(प्रतिनिधी) तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना कार्यालयात स्वराज्य जननी राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना कार्यालयात स्वराज्य जननी राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी कारखान्याचे सचिव सुरेश लगड यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कारखाना कार्यालयात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमास सुरेश लगड यांच्यासह बळीराम निपटे,नानासाहेब वाघचौरे,बालाजी सुरवसे, महादेव मुरकुटे नागोराव निर्मळ, ज्ञानेश्वर ठोंबरे, अंकुश देशमुख, वाशिंबे मामा आदिसह कारखाना अधिकारी, कर्मचारी, कामगार उपस्थित होते.

प्रहार शिक्षक संघटनेचा गौरवपूर्ण उपक्रम : सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) : प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, ता.माजलगाव, जि.बीड यांच्या वतीने रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ शिक्षक सहकारी पतसंस्था माजलगाव येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षक मा.चत्रभुज गवळी, माणिक राठोड, मा.शेख मंजूर, मा.शरद नायबळ, श्रीम.वंदना मगरे, श्रीम.संध्या सोळंके यांचा तसेच राष्ट्रमाता जिजाऊ शिक्षक सहकारी पतसंस्थेचे नवनिर्वाचित संचालक श्रीम.संगिता कोरडे, इंद्रजित तौर, नरसिंग भांजे, तसेच सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड येथे कनिष्ठ सहायक पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल मा.गोरख उघडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.रमेशराव फपाळ (चेअरमन शिक्षक सहकारी पतसंस्था) हे होते. सत्कार मा.रवींद्र कुलकर्णी (सेवानिवृत्त मुख्याध्यापक) यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे जिल्हा पदाधिकारी मा.ओमप्रकाश आनेराव (जिल्हा कार्याध्यक्ष), मा.शाम मिरगे (जिल्हा उपाध्यक्ष), मा.संजय कुलकर्णी (जिल्हा सहसचिव) यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका अध्यक्ष श्री.लक्ष्मण सरवदे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात भागवत कोकणे, भारत ढेपे, नरसिंग भांजे, अमित राऊत, अशोक तिदार, महेश कुलकर्णी, सुगत सोनवणे, बालाजी सूरेवाड, महेश खुणे, विनोद जाधव, शरद कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. याचवेळी प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, माजलगाव तालुकाध्यक्षपदी श्री.लक्ष्मण सरवदे यांची पुनर्निवड झाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या मागील चार वर्षांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत त्यांचा विशेष सत्कार केला तसेच श्री.गोविंद गोचडे यांची आरोग्यविभाग जिल्हाप्रमुखपदी पुनर्निवड झाल्याबद्दल त्यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी सत्कारमूर्ती यांनी सत्काराला प्रतिउत्तर मनोगत सादर केली. मान्यवरांनी शिक्षकांच्या सामाजिक योगदानावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विविध संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदवी स्वराज्य अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. माजलगाव जि.बीड

जाहीर लिलाव

हिंदवी स्वराज्य अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. माजलगाव जि.बीड या संस्थेमध्ये उपलब्ध असलेली तिजोरी, लाकडी फर्निचर ''जसे आहे'' स्थितीत विक्रीसाठी कोटेशन मागविण्यात येत आहे . यासाठी इच्छुकांनी दिनांक २८.०१.२०२६ पर्यंत अवसायक यांचेकडे सिलबंद कोटेशन सादर करावे. प्राप्त कोटेशन सर्वाधिक रक्कमेचे मंजूर करण्यात येईल व संबंधितास कळविण्यात येईल.

स्वाक्षरीत
(एस.के.शेरखाने) अवसायक
हिंदवी स्वराज्य अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटी
लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

जाहीर प्रगटन

अपर विभागीय आयुक्त क्र.२ छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालय विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्र.क्र.२०२३/आर.ओ.आर./आरईव्ही/सीआर-२३३ दि.०१/०१/२०२६

ज्ञानेश्वर तुळशीराम दळवी विरुद्ध **श्री.मिलिंद माधवराव बीडकर व इतर**

प्रति,

१) मिलींद माधवराव बीडकर, २) महेंद्र माधवराव बीडकर, ३) माधुरी पुरोषोत्तम कुलकर्णी, अ.क्र. ३ ते ५ रा. सी.-८०६ यश कॉम्प्लेक्स गोत्री रोड, बडोदा गुजरात ४) विश्राम वसंतराव बीडकर, ५) विश्वास वसंतराव बीडकर, ६) कुसुम वसंतराव बीडकर, ७) विद्या वसंतराव बीडकर, ८) विभा वसंतराव बीडकर अ.क्र.६ ते १० रा. श्रीरंग सोसायटी ठाणे ता. जि. ठाणे, ९) दादाराव आण्णाराव दळवी, १०) शवेताबाई आण्णाराव दळवी, ११) वामण धोंडीबा दळवी अ.क्र. ११ ते १३ रा. भाजीमंडई बीड ता. जि. बीड – प्रतिवादी

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, ज्ञानेश्वर तुळशीराम दळवी यांनी या न्यायालयाचे आदेश जा.क्र.२०२१/आरओआर/आरईव्ही/सिआर-२३ दिनांक १४/०६/२०२३ च्या आदेशाच्या नाराजीने या न्यायालयात पुर्नस्थापित अर्ज दाखल केले आहे. तरी सदर प्रकरण दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा. अपर विभागीय आयुक्त क्र. ०२, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

करीता उपरोक्त तारखेवर सुनावणीसाठी आपण स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपली बाजु मांडावी. नोटीसीची एकप्रत घेवुन दुसरीप्रत दिनांकित स्वाक्षरीनिशी परत करावी. उपरोक्त तारखेवर हजर न राहिल्यास एकर्ती निर्णय घेण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

(मा. अपर विभागीय आयुक्त क्र. ०२ यांचे मान्यतेने)

अपर विभागीय आयुक्त क्र.०२
छत्रपती संभाजीनगर, करिता

16489/13426

जाहीर नोटीस

बीड जिल्ह्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार **श्री.प्रभाकर शेषराव नागरगोजे,** वय-६० वर्षे, धंदा-सेवानिवृत्त, रा. संत वामनभाऊ नगर, राजीव गांधी रोड, बीड ता. जि.बीड यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरूनं या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की,

नसीम सुलताना मोहम्मद मुखतार, वय-६१ वर्षे, धंदा-घरकाम व सेवानिवृत्त, रा.डी.सी.सी. बँकेच्या पाठीमागे, बशीरगंज, बीड ता.जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड डि.पं.स.ता.व बीड पैकी शहर बीड मोहल्ला अंकुश नगर, बीड येथील नगर परिदषद हद्दीचे आतील सर्व्हे नं.२१० तरफ पिंगळे मधील प्लॉट क्रं. ७ ज्याची साईज पुर्व-पश्चिम दक्षिण बाजु-७.६२ मीटर व उत्तर बाजु-१२.११ मीटर आहे व दक्षिण-उत्तर-२९.५७ मीटर आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ २९२.९८ चौरस मीटर म्हणजेच ३१५२.४६ चौ. फुट आहे. ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : ७.६२ मीटर रुंदीचा रस्ता, **पश्चिमेस :** नाला

दक्षिणेस : ४० फुट रुंदीचा रस्ता, **उत्तरेस :** प्लॉट क्रं. १०

येणे प्रमाणे वर नमुद चतुः सिमेतील प्लॉट क्रं. ७ खरेदी करण्याचा व्यवहार आमच्या अशिलाने **नसीम सुलताना मोहम्मद मुखतार** यांचे सोबत केलेला असुन त्यांनी आमचे पक्षकाराचे हक्कात ईसारपावती करुन दिलेली आहे. तसेच सदर प्लॉट क्रं. ७ चे नोंदणीकृत खरेदीखत लवकरच करण्याचे ठरले आहे. सदरचा प्लॉट क्रं. ७ हा निर्विवाद असल्याचे **नसीम सुलताना मोहम्मद मुखतार** यांनी आमचे पक्षकाराला सांगितलेले आहे. तसेच आमचे पक्षकार किंवा ते सांगतील त्या व्यक्तींचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन देण्याचे ठरले आहे.

तरी सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वरील प्लॉट क्रं. ७ संदर्भात कोणाचे काही हितसबंध, वाटणी, गहाणखत, कर्ज व देवाण घेवाण, चोळीबांगडी, कोर्ट वाद अथवा इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ०७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर संपर्क साधावा व उजरदारी करावी कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर वर नमुद प्लॉट क्रं. ७ चे खरेदीखत आमचे अशिल करुन घेतील त्यानंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरुन खरेदीखत करुन घेण्यात येईल.

करीता ही नोटीस. दिनांक :-१२/०१/२०२६.

– जाहीर प्रगटन देणार –
श्री.प्रभाकर शेषराव नागरगोजे
रा.संत वामनभाऊ नगर, राजीव गांधी रोड,
बीड.ता.जि.बीड.मो.८२७५००४८७०

मार्फत
ॲड.जी.एम.केकान
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.८०८७६१७०२७

14379

पार्श्वभूमी

दि.१३ जानेवारी २०२६ मंगळवार

पान ६

ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा

बीड दि.१२(प्रतिनिधी):- आय बी बी एफ महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन. मुंबई यांचे मान्यतेने व अहिल्या नगर असोसिएशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिजीक स्पोर्ट्स यांच्या विदयमाने ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ व (मास्टर्स / दिव्यांग)आणि ज्युनिअर महाराष्ट्र श्री स्पर्धे चे आयोजन शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सांयकाळी ५ वाजता विठठला लान्स राहुरी जिल्हा अहिल्या नगर येथे करण्यात आलेले आहे या स्पर्धेकरिता बीड जिल्हा ज्युनियर, मास्टर्स, दिव्यांग शरीर सौष्ठव चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार १८ जानेवारी रोजी सायः ६:३० वाजता मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन व बीड जिल्हा असोसिएशन, लाईफ हेल्थ क्लब लाईफ स्टाईल जिम महात्मा फुले शॉपिंग सेंटर,नवी भाजी मंडई बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे तरी जिल्ह्यातील इच्छुक स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे ,कार्य अध्यक्ष आ. विजयसिंह पंडित, सचिव डॉ.सय्यद अरशियान उल्लाह मिसबाह उल्लाह, डॉ. सय्यद मसीह, ॲड.शेख शफीक भाऊ, अविनाश नाईकवाडे, विक्रांत हजारे , गोरख कैवाडे , सय्यद सिराज सर (परळी), जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन चे सचिव सय्यद अमान उल्लाह यांनी केले. अधिक माहितीसाठी संपर्क करा जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन सचिव सय्यद अमान उल्लाह लाईफ जिम बीड ८१४९७७७९७.

पाली महसुल मंडळातुन २७ ब्रास दगडसाठा जप्त
महसुल विभागाची कारवाई; जेसीबी,हायवाही ताब्यात

बीड दि.१२ (प्रतिनिधी) :- तालुक्यात गेल्या काही दिवसांपासुन गौण खनिजांचे अवैध उत्खनन सुरू आहे. त्याच अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने आणि तहसिलदार शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसुलच्या कर्मचाऱ्यांनीच पाली परीसरात कारवाई करून २७ ब्रास दगडसाठा जप्त केला आहे. जेसीबी आणि हायवा देखील ताब्यात घेण्यात आले असुन पुढील दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी शितल चाटे, महसुल सहाय्यक भारत भंडाणे यांनी पाली महसुल मंडळात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खननावर कारवाई केली. जेसीबीच्या सहाय्याने उत्खनन करून हायवातुन त्याची वाहतुक होत असल्याचे दिसुन आले. यावेळी महसुलच्या पथकाने वायभटवाडी शिवारातुन २७ ब्रास दगडसाठा जप्त करून तहसिलला आणला आहे.

तालुक्यात ठिकठिकाणी अवैध उत्खनन

बीड शहर परीसरासह तालुक्यात ठिकठिकाणी गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतुक सुरू आहे. महसुलचे अधिकारी, कर्मचारी मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येत आहे. वास्तविक पाहता संबंधित मंडळ अधिकाऱ्यांसह महसुलच्या कर्मचाऱ्यांनाही कुठे अवैध खदानी सुरू आहेत, कोणकोणत्या हायवामधुन गौण खनिजांची वाहतुक केली जाते, याचीही माहिती त्यांना असते, मात्र कारवाईसाठी कोणीच पुढे येत नाही. किमान तहसिलदार साहेबांनी यामध्ये लक्ष घालणे आवश्यक आहे.

१५ दिवसांपासुन अल्पवयीन मुलीचा शोध लागेना
बीड शहर पोलीसांचे दुर्लक्ष

बीड दि.१२(प्रतिनिधी):- १५ दिवसांपुर्वी बेपत्ता असलेल्या मुलीचा शहर पोलीसांना अद्यापही शोध लावता येत नसल्याने संताप व्यक्त होऊ लागला आहे. १५-१५ दिवस शोध लागत नसेल तर अशा प्रकरणांमध्ये पोलीस किती गांभिर्याने घेतात हे देखील समोर आले आहे. शहर पोलीसांनी तातडीने मुलीचा शोध घ्यावा अशी मागणी नातेवाईकांकडून होऊ लागली आहे.बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतुन दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याच्या संशयावरून पालकांनी तक्रार देवुन १५ दिवस झाले तरीही अद्याप अल्पवयीन मुलीचा शोध लागलेला नाही. सदरील मुलीचा शोध लावण्यात यावा, अशी मागणी पालकाकडून होऊ लागली आहे. दरम्यान गेल्या काही दिवसांपासुन गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलीसांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे संबंधित पालक थेट पोलीस अधिक्षक कार्यालयात जावु लागले आहेत.

युवक काँग्रेस राबवणार मनरेगा बचाव संग्राम–ॲड.श्रीनिवास बेदरे

गेवराई दि १२(प्रतिनिधी) -कोविड-१९ महामारीमुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडली असताना, मनरेगा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार देऊन देशाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्याचे महत्त्वपूर्ण काम झाले होते. मात्र, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या या अत्यंत महत्त्वाच्या मनरेगा योजनेला भाजप सरकारकडून जाणीवपूर्वक संपवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप बीड जिल्हा युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड.श्रीनिवास बेदरे यांनी केला आहे. मनरेगा योजनेचे नाव बदलणे, तसेच या योजनेत मोठ्या प्रमाणावर बदल करून काही मोजक्या कंत्राटदारांना लाभ पोहोचवण्याच्या हेतूने धोरणात्मक निर्णय घेतले जात असल्याचे त्यांनी सांगितले. हे बदल अतिशय निंदनीय असून, यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या अन्यायकारक धोरणांचा निषेध करण्यासाठी आणि मनरेगा योजना पूर्वीच्या पद्धतीनेच प्रभावीपणे राबवावी,यासाठी https://www.mgnregabachao.in आणि ९८७३०१०६०६ या नंबर वरती मिस्ड कॉल देऊन या संग्राम मध्ये बीड जिल्हयातील नागरिकांनी जास्तीत जास्त संख्यांनी सहभागी होण्याचं आव्हान युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.

अपात्र लाडक्या बहिणींना पुन्हा ई-केवायसीची संधी द्या–जे.डी.शाह

बीड - जिल्ह्यातील लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी किंवा नजरचुकी मुळे अपात्र ठरलेल्या तसेच अद्याप ई-केवायसी प्रलंबित असलेल्या महिलांना पुन्हा एकदा ई-केवायसी करण्याची संधी द्यावी. तसेच ज्या पात्र लाडक्या बहिणींचे आर्थिक सहाय्य थांबले आहे, ते पुन्हा सुरू करण्यात यावे, अशी समाजसेवक मागणी जे.डी.शाह यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच पालकमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केले आहे की, गेवराईसह बीड जिल्ह्यातील तसेच संपूर्ण राज्यातील अनेक लाभार्थी महिलांकडून लाडकी बहीण योजनेसंदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारीनुसार, ई-केवायसी प्रक्रिया करताना काही घरामध्ये शासकीय कर्मचारी आहे हा पर्याय निवडला गेला आहे. परिणामी संबंधित महिलांना ई- केवायसी शासकीय कर्मचारी असा नकार संदेश प्राप्त होत असून त्या महिलांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. वास्तविक पाहता, संबंधित महिलांच्या कुटुंबामध्ये कोणताही शासकीय कर्मचारी नसताना केवळ तांत्रिक चूक, माहितीअभावी किंवा अज्ञानामुळे झालेल्या चुकीच्या निवडीमुळे त्या महिला अपात्र ठरत आहेत. याशिवाय, काही महिलांची ई-केवायसी प्रक्रिया विविध कारणांमुळे अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यामुळे त्यांनाही योजनेचा लाभ मिळालेला नाही. लाडकी बहीण योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना राबविण्यात येत आहे. अशा परिस्थितीत केवळ तांत्रिक अडचणी किंवा मानवी चुका यांमुळे कोणतीही पात्र महिला या महत्त्वपूर्ण योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची ही भूमिका असल्याचे समाजसेवक जे.डी.शाह यांनी नमूद पान २ वर

बीडच्या भूमिपुत्रासाठी आ.धस मुंबईच्या मैदानात; नवनाथ बन यांच्या प्रचारार्थ मानखुर्दमध्ये साधला थेट जनसंवाद

पाटोदा दि.१२(महेश बेदरे):- बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर वॉर्ड क्रमांक १३५ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार नवनाथ बन यांच्या प्रचारासाठी आष्टी-पाटोदा मतदारसंघाचे आमदार व भाजपाचे स्टार प्रचारक आमदार सुरेश धस यांनी सोमवारी मानखुर्द-मंडाळा परिसरात जोरदार प्रचार करत नागरिकांशी थेट संवाद साधला. मानखुर्द विभागातील मोहिते पाटील नगर, शिवनेरी नगर, म्हाडा कॉलनी तसेच सिद्धिविनायक गणेश मंदिर परिसरात आमदार सुरेश धस यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीच्या विकास, पारदर्शकता आणि जनसेवेच्या धोरणांची माहिती दिली. आपल्या खास स्पष्ट आणि थेट शैलीत बोलताना त्यांनी सामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यावर ठोस उपाययोजनांचे आश्वासन दिले.नागरिकांशी संवाद साधताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, उमेदवार नवनाथ बन हे एक निर्भीड, प्रामाणिक व लोकाभिमुख पत्रकार म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सामाजिक प्रश्नांची जाण, सामान्य माणसाशी असलेली घट्ट नाळ आणि जमिनीवरील वास्तवाचा अनुभव हे त्यांच्या उमेदवारीचे मोठे बलस्थान असल्याचे आमदार धस यांनी यावेळी अधोरेखित केले. विद्यार्थीदशेपासून अखिल भारतीय विद्यार्थी

परिषदेमध्ये सक्रिय राहून त्यांनी संघटन कौशल्य व नेतृत्वगुण विकसित केल्याचेही त्यांनी नमूद केले.मुंबईसारख्या महानगरात सामान्य माणसाचा आवाज बुलंद करणारे, पारदर्शक आणि काम करणारे नेतृत्व आवश्यक आहे. पान २ वर

निवासी शिबिरातून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडते –डॉ.अरुण दैतकर

गेवराई दि १२ (प्रतिनिधी)- येथील र. भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने मन्यारवाडी- गोविंदवाडी ग्रामपंचायत आणि बालग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासासाठी युवकांची भूमिका : जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास' या संकल्पनेवर पान २ वर

जिजाऊ मॉसाहेब जयंती व आ.टिळेकर अभिष्टचिंतन विशेष निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

म्हाळस जवळा दि.१२(प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील म्हाळस जवळा या ठिकाणी काल राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीनिमित्त व विधान परिषद सदस्य आ.योगेश अण्णा टिळेकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त आयोजक रामप्रसाद राऊत यांच्या दर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आलेले होते. यावेळी या रक्तदान शिबिरामध्ये त्यांच्या ३८ सहकार्यानि यावेळी रक्तदान केलेले असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांची उपस्थिती होती तर शंभुराजे खांडे, ग्रा.स अजय राऊत , ग्रा.स.अविनाश पाटोळे,सावता परिषदेचे तालुका प्रमुख बाबु राऊत,योगेश खांडे,बाबू खांडे अशोक राऊत,पिंटू जंजाळ, सुग्रीव खांडे ,शुभम खांडे,भागवत राऊत,महेश राऊत,राजू खांडे,भागवत खांडे, मंगेश खांडे,सुशील खांडे ,नितीन खांडे व इतर मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी राजू उनवणेंची निवड

बीड दि १२ (प्रतिनिधी)- संत रविदास महाराज व वीर कंकय्या महाराज यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने बीड येथील विश्रामगृहात झालेल्या बैठकीत संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी बीड जयंती कार्यकारणी निवड करण्यात आली. पान २ वर

समाज सेवक दिलीप धुत यांना वाढदिवसा निमीत्त शुभेच्छा देतांना गणेश राऊत, रविंद्र जाधव, रमेश घोडके.

५८० मीटर लांबीचा होणार उड्डाण पूल
बहुचर्चित कडा रेल्वे उड्डाणपूलाच्या कामाला सुरुवात

धामणगाव दि १२(प्रतिनिधी)- गेल्या अनेक महिन्यांपासून रेल्वे मार्ग झाल्याने उड्डाणपूल न करता रस्ता क्रॉसिंग करताना काटकोनाचा वळण रस्ता केल्याने व रस्ता चांगला झाल्याने वाहनाची वर्दळ वाढली.आणि याच क्रॉसिंग वर २ बळी व १०० च्या वर अपघातात वाहनचालक जखमी झाले असताना उड्डाणपूलाचा प्रश्न ऐरणीवर आला होता.यासाठी ५० कोटीचा निधी देखील आ.राम सातपुते यांनी मंजूर केला होता.आता या कामाला अनेक महिन्यानंतर नवीन वर्षापासून सुरवात झाली असून ५८० मीटर लांबीचा हा उड्डाण पूल होणार आहे. आष्टी तालुक्यातील कडा येथून पैठण बारामती महामार्ग गेला असल्याने व रेल्वे देखील याच मार्गावरून सुरू झाली आहे.त्यामुळे उड्डाणपुलाची मागणी जोर धरत होती. यासाठी माळशिरसचे माजी आ.राम सातपुते यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मागील दीड वर्षीपुर्वी या उड्डाणपुलासाठी निधी मंजूर झाला होता. मात्र काही कारणांमुळे काम रखडले होते. पान २ वर

वडवणी तालुका संघटनेच्या अध्यक्षपदी शिवाजी खोसे व सचिवपदी यशवंत यांची एकमताने निवड

वडवणी दि.१२ (प्रतिनिधी):- तहसील कार्यालय वडवणी येथे तलाठी संघटनेची बैठक संपन्न झाली ,यात वडवणी तालुका तलाठी संघटनेच्या रिक्त असलेल्या तलुका अध्यक्ष पदाच्या निवडीबाबत चर्चा होऊन एक मताने वडवणी तालुका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी शिवाजी खोसे तर सचिव पदी यशवंत एस.टी. यांची एकमताने निवड करण्यात आली. याविषयी अधिक माहिती अशी की आज दिनांक १२ जानेवारी सोमवार रोजी वडवणी तहसील कार्यालय येथे तलाठी संघटनेची बैठक संपन्न झाली, यात वडवणी तालुका अध्यक्षपदी शिवाजी मोहनराव खोसे यांचे नाव समोर आले, त्यानुसार अध्यक्षपदी यांची एक मतांनी निवड करण्यात आली, तसेच उपाध्यक्षपदी सचिन फुलचंद मुंडे, सचिवपदी यशवंत एस.टी., कार्याध्यक्षपदी श्रीमती आर्मी वैजनाथ जाधव, कोषाध्यक्ष पदी भरत दगडू शिंदे, सहसचिवपदी बिरले प्रशांत रामराव, मार्गदर्शन म्हणून खाडे एफ.सी., शेळके इंद्रजीत विजयकुमार, पान २ वर

लग्नाचे आमिष दाखवून पोलिस अंमलदाराचा तरूणीवर अत्याचार

धामणगाव दि १२(प्रतिनिधी)- लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शरीर संबंध ठेवून साखरपुड्याचा कार्यक्रम होऊन देखील लग्न करण्यास नकार देत शरीर संबंध ठेवत आमिष दाखवून पोलिस अंमलदाराने अत्याचार केल्याची घटना तालुक्यातील एका गावात घडली असुन याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील एका गावातील तरूणीला तिच्या घराशेजारीच राहणाऱ्या तरूणाने १ एप्रिल २०२२ ते १ मार्च २०२५ या कालावधीत लग्नाचे आमिष दाखवले.आमची ओळख वाढल्यावर फोनवर बोलू लागले. मग त्याने घरी येऊन आई नसताना वारंवार शरीर संबंध ठेवले नंतर तो मिरा भाईदंर येथील पोलीस आयुक्तालयात पोलीस भरती झाल्यानंतर तो गावी येत असे.तेव्हा देखील माझी आई घरी नसताना शरीर संबंध ठेवत होता. मार्च २०२५ मध्ये हा प्रकार घरच्यांना समजल्यावर १ मार्च २०२५ रोजी त्याच्या सोबत साखरपुडा लावून देण्यात आला.लग्नाची तारीख काढायची असल्याने पिडीतेची आई विचारणा करून लागल्याने त्याने लग्नास नकार दिला.व माझ्या सोबत लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शरीर संबंध ठेवल्याने २४ वर्षीय पिडीतेच्या फिर्यादीवरून मच्छिंद्र हरिभाऊ राठोड रा.तागखेल ता.आष्टी.जि.बीड याच्यावर अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याचा पुढील तपास अंभोरा पोलिस करीत आहेत.

पोलिसांच्या सतर्कतेने चौकशीसाठी ताब्यात घेतलेला निघाला गुन्हेगार

बीड दि १२ (प्रतिनिधी):– बीड शहर पोलिसांच्या वेळेवर आणि सतर्क कारवाईमुळे शहरात होऊ शकणारा मोठा अनर्थ टळल्याची घटना ११ जानेवारी २०२६ रोजी घडली. बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील माळी वेस चौक परिसरात संशयास्पदरीत्या उभी असलेली स्कार्पिओ गाडी तपासणीदरम्यान धारदार, घातक कोयता आढळून आल्याने एक सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात आला आहे.

दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे हे त्यांच्यासोबत पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान व चालक फिरोज पठाण यांच्यासह रात्रगस्त घालत असताना माळी वेस चौक येथे रात्री ११ वाजण्याच्या सुमार पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ (क्रमांक एम.एच. १७बीई५००७) संशयास्पद अवस्थेत उभी असलेली दिसून आली. पोलिसांनी गाडीत बसलेल्या इसमाची चौकशी केली असता त्याने आपले नाव संजय पांडुरंग बहिर (वय २७, रा. नवघन राजुरी, ता. व जि. बीड) असे सांगितले. मात्र तो त्या ठिकाणी का थांबला होता याबाबत समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने पोलिसांचा संशय बळावला.त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे व पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान यांनी गाडीची सखोल तपासणी केली असता, स्कार्पिओच्या मधल्या सीटखाली एक लोखंडी पातीचा धारदार व घातक कोयता आढळून आला. पोलिसांनी तात्काळ संशयित आरोपीस ताब्यात घेऊन बीड शहर पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली असून, त्याच्या ताब्यातून एक लोखंडी धारदार कोयता व पांढऱ्या

रंगाची स्कार्पिओ गाडी जप्त करण्यात आली आहे.पोलिसांनी अधिक चौकशी केली असता,अटक करण्यात आलेला संजय बहिर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन, पिंपळनेर पोलीस स्टेशन व शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे खून पान २ वर